जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# शहरी भागात १०% पाणी कपात : उपलब्ध पेयजल जबाबदारीने वापरा

## हरिभुमी प्रतिष्ठानचे आवाहन

नगर – एल निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात पर्जन्यमानात घट झाल्याने उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व शहरांमध्ये १६ ऑक्टोबरपासून १० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध असलेल्या पेयजलाचा नागरिकांनी जबाबदारीने व काटकसरीने असे आवाहन हरिभूमि प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी केले आहे

पेयजलाचा वापर अंगणात सडा मारणे, वाहने धुणे इ. अनावश्यक कारणांसाठी कटाक्षाने टाळावा. याचबरोबर पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी घर कार्यालयातील टिपकणारे नळ, गळती पाईपलाईन इत्यादी तातडीने दुरुस्त करून घ्यावे. शक्य तेवढा पाण्याचा पुनर्वापर करावा. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता शासनाने प्रशासकीय पातळीवर उपाययोजना सुरू केल्या आहेत. परंतु त्याकरिता नागरिकांचेही सहकार्य अपेक्षित असते.

आज प्रत्येक नागरिकाने गरजेपुरते पाणी, काटकसरीचा वापर आणि प्रत्येक थेंबाचा पुनर्वापर ही जीवनशैली स्वीकारण्याची गरज आहे. पाणी उपलब्ध आहे म्हणून त्याचा अमर्याद वापर करणे योग्य नाही. आज वाचवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पाणीटंचाईच्या काळात महत्त्वाचा ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी स्वतःहून पाणी बचतीची सुरुवात घरापासूनच करावी, असे आवाहन अभय ललवाणी यांनी केले आहे.

# ‘नवरात्रोत्सव पार्श्वभूमीवर’ केडगाव देवी परिसरातील स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, रस्ते, मोकाट कुत्रे, जनावरे आणि अतिक्रमणांबाबत तातडीच्या उपाययोजना कराव्यात

### महापौर, आयुक्तांकडून पाहणी; भाविकांनी कायनेटिक चौक–मोहिनीनगर रेल्वे भुयारी मार्गाचा वापर करावा : महापौर ज्योतीताई गाडे





नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापौर, आयुक्तांनी केडगाव देवी परिसराची स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, रस्ते, मोकाट कुत्रे, जनावरे व अतिक्रमणांची पाहणी करून तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – नवरात्रोत्सवाचा सण जवळ आला असून, केडगाव देवी मंदिर परिसरात दर्शनासाठी जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी महापौर ज्योतीताई गाडे व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केडगाव देवी परिसराची पाहणी केली. यावेळी स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, रस्त्यांचे पॅचिंग, मोकाट कुत्रे, जनावरे, अतिक्रमणे आदी विविध बाबींचा आढावा घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेविका कमल कोतकर, नगरसेविका अश्विनी लोंढे यांच्यासह इंजिनिअर महादेव काकडे, श्रीकांत निंबाळकर, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, विद्युत विभाग प्रमुख शांताराम क्षेत्रे आदी उपस्थित होते.

ज्योतीताई गाडे म्हणाल्या, केडगाव देवी हे भाविकांचे श्रद्धास्थान असून नवरात्रोत्सवात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. या काळात भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी मनपाच्या माध्यमातून विविध सुविधा व उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने आज परिसराची पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मोहिनीनगर येथे रेल्वे भुयारी मार्ग तयार झाला असून, कायनेटिक चौक–दौंड रोडमार्गे केडगाव देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना हा जवळचा मार्ग उपलब्ध झाला आहे. पुणे महामार्गावरून येताना भाविकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे भाविकांनी कायनेटिक चौक, मोहिनीनगर रेल्वे भुयारी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

मनोज कोतकर यांनी केडगाव देवी परिसरातील विविध समस्यांची माहिती महापौर व आयुक्तांना दिली. नवरात्रोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत केडगाव देवीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. त्यामुळे महापालिकेच्या माध्यमातून भाविकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

केडगाव देवी परिसरातील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सात कोटी रुपये मंजूर झाले असून, हे काम लवकरच सुरू होणार असल्याचे मनोज कोतकर यांनी सांगितले. याचबरोबर महापालिकेच्या माध्यमातून परिसरातील ड्रेनेज लाईन तसेच रस्त्यांची कामेही मार्गी लावावीत, अशी मागणी त्यांनी केली. यावर आयुक्त यशवंत डांगे यांनी संबंधित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावला जाईल, असे आश्वासन दिले.

आयुक्त यशवंत डांगे यांनी केडगाव देवी परिसरातील विविध कामांचा आढावा घेत प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, रस्त्यांचे पॅचिंग, मोकाट कुत्रे व जनावरे तसेच अतिक्रमणांच्या प्रश्नांवर आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

# निवासी जागेच्या प्रश्नासाठी २१ ऑक्टोबर रोजी उपोषण

नगर – पिंपरी निर्मळ येथील निवासी जागेचा प्रश्न मार्गी लावून न्याय मिळावा, तसेच अमरधामच्या विस्तारासाठी ताब्यात घेतलेली जागा तत्काळ मोकळी करावी, या मागणीसाठी नंदू पोपट पारखे यांनी तहसीलदार, राहाता यांना निवेदन देत २१ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. या प्रकरणी तहसील प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करून न्याय द्यावा, अशी अपेक्षा पारखे यांनी व्यक्त केली आहे. निवेदनाच्या प्रती तहसीलदार, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलिस प्रमुख अहिल्यानगर यांना देण्यात आल्या आहेत व संबंधित अधिकाऱ्यांना लवकरच देण्यात येणार आहेत.

# आदिवासी जमिनीवरील ‘पिक-पाणी’ नोंद रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

नगर – पारनेर तालुक्यातील पुणेवाडी येथील आदिवासी समाजाच्या शासकीय जमिनीवर इतर समाजातील व्यक्तींनी पिक–पाणी नोंद लावल्याचा आरोप करीत ही नोंद तातडीने रद्द करावी, तसेच संबंधित जमिनीची चौकशी करून मूळ लाभार्थ्यांच्या वारसांची नोंद करण्यात यावी, या मागणीसाठी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले. संबंधित प्रशासनाला एक महिन्यापूर्वी निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने आंदोलकांनी तीव्र संताप व्यक्त केला.

प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नामदेव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ सुलाखे पाटील, मातंग एकता आंदोलन जिल्हाकार्याध्यक्ष संतोष शेलार, आदिनाथ उमाप, संजय पठारे, रामदास साळवे, राजू आल्हाट, रवी साळवे, अविनाश उमाप, निखिल मोरे, सतीश साळवे, बाबाजी साळवे, प्रमोद आरणे, शिवाजी दळवी, कडूबाबा लोंढे, भगवान नवगिरे, साधना मोरे, हिराबाई गोरखे, अशोक भोसले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



आदिवासी जमिनीवरील ‘पिक–पाणी’ नोंद रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेले आदिवासी बांधव.

## सौ. मंगलबाई भोईटे यांचे आकस्मिक निधन



नगर – सांगवी काष्टी येथील रहिवासी सौ. मंगलबाई शिवाजी भोईटे (वय ६५) यांचे ५ ऑक्टोबर रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर घोडनदी, भिमा संगम, सांगवी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, मुली, दीर, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुनील भोईटे यांच्या त्या मातोश्री होत.

## अरुणाबाई भळगट यांचे अल्प आजाराने निधन



नगर – साई कॉलनी, फुलारी मळा येथील रहिवासी श्रीमती अरुणाबाई पोपटलाल भळगट (वय ७८) यांचे ६ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

योगेश व चेतन भळगट यांच्या त्या मातोश्री होत.

## पियुष गुगळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भवानीनगर येथील रहिवासी पियुष सतिश गुगळे (वय ३८) यांचे ५ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, बहिण, पत्नी, १ मुलगा, चुलते, भाऊ, चुलत्या, भावजया असा मोठा परिवार आहे.

सतिश गुगळे यांचे ते चिरंजीव तर कै. शिरीष अमोलकचंद गुंदेचा यांचे जावई होत.

## मनोहर शिंदे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – माळीवाडा येथील सौभाग्यसदन मंगल कार्यालय, ब्राम्हणगल्ली येथील रहिवासी मनोहर भिकाजी शिंदे (वय ८४) यांचे ५ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, जावई, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. संतोष मनोहर शिंदे यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यानगर महापालिकेचा विकास आराखडा वादाच्या भोवऱ्यात

### नियमबाह्य आरक्षण बदलांवर उच्चस्तरीय चौकशी करावी : मावळा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष निलेश म्हसे पाटील

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या आगामी सुधारित विकास आराखड्याच्या मसुद्यात मंजूर विकास आराखड्यातील अनेक आरक्षणे बेकायदेशीररीत्या रद्द करण्यात आली असून, अनेकांमध्ये फेरबदल करण्यात आला आहे आणि नियमांचे उल्लंघन करून नवीन आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहेत. याप्रकरणी मावळा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष निलेश सत्यवान म्हसे पाटील यांनी नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार केली असून, या संपूर्ण प्रक्रियेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील त्रुटी आणि आक्षेपांसंदर्भात पत्रात नमूद केलेली माहिती परिच्छेद स्वरूपात खालीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३८ नुसार सुधारित आराखडा तयार करताना विद्यमान आरक्षणे रद्द करण्यासाठी विद्यमान जमीन वापर सर्वेक्षण, लोकसंख्या प्रक्षेपण व तांत्रिक औचित्य अहवालात नमूद करणे बंधनकारक असताना मसुद्यात तसे केलेले दिसत नाही. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ व २८ नुसार प्रसिद्धी व हरकती–सुनावणीची प्रक्रिया पारदर्शकपणे व पूर्ण माहितीसह राबविण्यात येत नसून, विकास आराखड्यावर हरकती नोंदवण्यासाठी नागरिकांना किमान ६० दिवसांचा कालावधी देणे आवश्यक असताना अहिल्यानगर मनपा प्रशासनाने केवळ ३० दिवसांची मुदत दिली आहे, जी अयोग्य आहे. तसेच विकास आराखड्याचा मसुदा प्रसिद्ध करताना रद्द किंवा बदललेल्या आरक्षणांची स्वतंत्र यादी व कारणे प्रसिद्ध केलेली नाहीत. कलम १२७ व कलम ४९ नुसार व्यपगत झालेली आरक्षणे वगळता, शासनाकडून मंजूर विकास आराखड्यातील वैध आरक्षणे केवळ प्रशासकीय सोयीसाठी रद्द करता येत नसताना मनपा प्रशासनाने कुठल्या अधिकारात किंवा कायद्यानुसार आरक्षणांना वगळले याची चौकशी करावी. नवीन आरक्षणे प्रस्तावित करताना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCPR) व शासनाच्या मार्गदर्शक सूत्रांचे पालन झालेले नाही. कलम २३ नुसार विकास आराखडा तयार करण्याचा इरादा प्रथम राजपत्र व वर्तमानपत्रात जाहीर करणे बंधनकारक असून, प्रत्यक्षात प्रत्यक्ष जमीन वापर सर्वेक्षण ३१ डिसेंबर २०२० पासून सुरू झाले असताना इरादा ७ मार्च २०२४ रोजी म्हणजेच सर्वेक्षण सुरू झाल्यानंतर सुमारे चार वर्षांनी जाहीर करण्यात आला, जी कायद्यातील विहित क्रमाच्या विरुद्ध असून संपूर्ण मसुदा दूषित ठरतो. एखाद्या खासगी जमिनीवर आरक्षण टाकण्यापूर्वी मालकी हक्क, महसुली दावे व वित्तीय संस्थांकडील तारण याबद्दलची माहिती संकलित न केल्यामुळे भविष्यात कायदेशीर गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. याशिवाय, अहिल्यानगर मनपाच्या विकास आराखड्यात अहमदनगर कॅन्टोन्मेंटच्या हद्दीतील मोठा भूप्रभाग दर्शविण्यात आला असून, हा भाग मनपा किंवा राज्य शासनाकडे हस्तांतरित झालेला नसल्याने व त्याचे रेकॉर्ड महसूल किंवा नगर भूमापन कार्यालयाकडे नसून रक्षा विभागाच्या डिफेन्स इस्टेटकडे असल्याने यासंदर्भातील सर्व रेकॉर्ड तपासून योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.

कार्यालयाकडे मोजणीचा नकाशा उपलब्ध होत नसल्यामुळे या जमिनींच्या कायदेशीर विकासाची प्रक्रिया पूर्ण होत नाही. या पार्श्वभूमीवर, महसुली मिळकती स्वरूपात किंवा स्वामित्व स्वरूपात राज्य शासनाकडे हस्तांतरित झालेला नसलेल्या भूभागावर मनपा विकास आराखड्यात विविध आरक्षणे कोणत्या कायद्याखाली प्रस्तावित करीत आहेत, याची कायदेशीर स्पष्टता तपासण्यात यावी. तसेच वरील प्रक्रियेत्मक अनियमिततेची व आरक्षणांमधील बेकायदेशीर बदलांची नगररचना विभागाच्या संचालक स्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यात यावी. जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत कलम ३१ खालील अंतिम मंजुरीची प्रक्रिया स्थिगत ठेवली जावी आणि रद्द करण्यात आलेल्या प्रत्येक आरक्षणाचे सर्वेक्षण–आधारित औचित्य जनतेसाठी प्रसिद्ध करून नव्याने हरकती मागवण्यात याव्यात. याशिवाय, प्रसिद्ध करण्यात आलेल्या विकास आराखड्याच्या मसुद्यावर अभ्यास करून सविस्तर हरकती दाखल करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी पुरेसा नसून, यासाठी आधीचा ३० दिवसांचा कालावधी वाढवून मिळावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# नित्यसेवा सोसायटी ते अभियंता कॉलनी डीपी रस्त्याचे तातडीने भूसंपादन करून काँक्रिटीकरण करण्यात यावे

### मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे नगरसेवक महेश तवले यांची निवेदनाद्वारे मागणी



नित्यसेवा सोसायटी ते अभियंता कॉलनी डीपी रस्त्याचे तातडीने भूसंपादन करून काँक्रिटीकरणाचे काम मार्गी लावण्याच्या मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना नगरसेवक महेश तवले आदी. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – मनपा प्रभाग क्रमांक दोनमधील नित्यसेवा सोसायटी ते अभियंता कॉलनीपर्यंत प्रस्तावित असलेल्या १८ मीटर रुंदीच्या डी. पी. रस्त्याचे भूसंपादन तातडीने करून रस्ता काँक्रिटीकरणाचे काम मार्गी लावावे, अशी मागणी नगरसेवक महेश तवले यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सदर रस्ता पूर्ण झाल्यास परिसरातील नागरिकांना दळणवळणासाठी जवळचा मार्ग उपलब्ध होऊन वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ होणार असल्याचे तवले यांनी सांगितले.

अहिल्यानगर शहरातील गुलमोहर रोड पोलीस चौकी ते श्रीराम चौक, नामदेव चौकापर्यंत डी.पी. रस्ता सुरू आहे. मात्र, नित्यसेवा सोसायटी ते अभियंता कॉलनीपर्यंतच्या रस्त्याचे भूसंपादन अद्याप झालेले नसल्यामुळे या भागातील रस्त्याचे काम पुढे नेता येत नाही. त्यामुळे महापालिकेने संबंधित रस्त्याचे भूसंपादन पूर्ण करून काँक्रिटीकरणाचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नगरसेवक महेश तवले यांनी निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक दोनमधील नित्यसेवा ते अभियंता कॉलनी या दरम्यान प्रस्तावित असलेला १८ मीटर रुंदीचा डी.पी. रोड हा परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सदर रस्त्याचे भूसंपादनाचे काम मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने परिसरातील नागरिकांना ये–जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ होऊन नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. तसेच नागरिकांना दळणवळणासाठी जवळचा मार्ग उपलब्ध होणार असल्याने वेळेची व प्रवासाची बचत होण्यास मदत होईल, असे तवले यांनी नमूद केले. त्यामुळे १८ मीटर डी.पी. रोडच्या भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी. भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावून रस्ता नागरिकांच्या वापरासाठी लवकरात लवकर खुला करण्यात यावा, अशी मागणी प्रभागातील नागरिकांच्या वतीने तसेच नगरसेवक म्हणून आपण करीत असल्याचे महेश तवले यांनी निवेदनात म्हटले आहे.

सदर विषयाची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना देऊन प्रलंबित काम मार्गी लावावे, अशी मागणीही त्यांनी आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, विवेक तांबे, पवन चुटके, रोहित आजबे, गिरीश तवले, आदेश कर्डिले आदी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### शरीराला ठेवा मोकळे

बाहेरून पाहताना घट्ट विजार घातलेली व्यक्ती सुंदर दिसते पण आतून शरीर मात्र ओरडत असते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शरीराला घट्ट आवळून ठेवल्यामुळे कातडीला अजिबात मोकळी हवा मिळत नाही. आपल्या कातडीला सुद्धा श्वास घ्यावा लागतो पण घट्ट कपड्यामुळे तो बंद होतो. घामाच्या ग्रंथी बंद होतात आणि घाम आतल्या आत मुरतो. याच घामामुळे मांडीच्या आतल्या भागात, गुडघ्याच्या मागे आणि कंबरेखाली बारीक फोड येणे, सारखी खाज येणे, आग होणे आणि तिथली कातडी काळी पडणे असे प्रकार घडतात. अनेक वेळा ही खाज इतकी वाढते की जखम होते आणि जखमेतून पू येऊ लागतो. दुसरा मोठा तोटा म्हणजे रक्ताच्या नळ्यांवर येणारा दाब. घट्ट विजारीमुळे मांडीजवळच्या शिरा दाबल्या जातात, त्यामुळे पायाकडून हृदयाकडे जाणारे रक्त अडकते. त्यामुळे पायाला सतत मुंग्या येणे, पाय सुजणे, पायाच्या शिरा निळ्या होऊन वर येणे आणि थोडे चालले तरी पाय दुखणे हे त्रास तरुण वयातच सुरू होतात. पोटाच्या भागातही हाच दाब पडतो. घट्ट पट्ट्यामुळे पोटावर सतत दाब राहतो, त्यामुळे खाल्लेले अन्न नीट खाली सरकत नाही, छातीत जळजळ होणे, ढेकर येणे, गॅस होणे आणि शौचास साफ न होणे असे पोटाचे विकार जडतात. कंबरेच्या हाडावर तर याचा सर्वात जास्त परिणाम होतो. घट्ट कपडा घालून खाली वाकणे, उठणे, बसणे यात कंबरेला ताण येतो आणि हळूहळू मणक्याची झीज सुरू होते. पुरुषांच्या बाबतीत हा धोका अधिक गंभीर आहे. सतत उष्णता अडकून राहिल्यामुळे शरीरातील महत्वाच्या अवयवांवर वाईट परिणाम होतो. स्त्रियांमध्येही पाळीच्या वेळी पोटदुखी वाढणे आणि जंतूसंसर्ग होण्याचा धोका वाढतो. वरवर पाहता हा फक्त कपड्याचा विषय वाटतो पण खरे पाहता हा आपल्या आरोग्याचा विषय आहे. पूर्वीचे लोक धोतर, लुंगी, सैल पायजमा वापरत होते त्यामागे हेच शहाणपण होते. शरीराला मोकळे ठेवा तरच शरीर तुम्हाला साथ देईल. शान चार दिवसांची असते पण शरीर आयुष्यभराचे असते.

## पाककला

### बेसन मटकी

**साहित्य :** मोड आलेली मटकी १ वाटी, बेसन १ वाटी, बारीक चिरलेला कांदा १ मोठा, बारीक चिरलेला टोमॅटो १, बारीक चिरलेली हिरवी मिरची २, आले लसूण पेस्ट १ चमचा, तेल ३ चमचे, मोहरी १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, हळद १/४ चमचा, तिखट १ चमचा, कांदा लसूण मसाला १ चमचा, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, पाणी गरजेनुसार

**कृती :** मोड आलेली मटकी स्वच्छ धुवून थोडे मीठ टाकून २ शिट्ट्या काढून उकडून घ्या. एका भांड्यात बेसन घेऊन त्यात थोडे पाणी, मीठ, हळद, तिखट घालून पातळसर कालवून घ्या. कढईत तेल गरम करा त्यात मोहरी, जिरे टाका. जिरे तडतडले की त्यात चिरलेला कांदा, हिरवी मिरची आणि आले लसूण पेस्ट टाकून कांदा सोनेरी रंगावर परता. त्यात चिरलेला टोमॅटो टाकून मऊ होईपर्यंत परता. आता त्यात उकडलेली मटकी, कांदा लसूण मसाला घालून २ मिनिटे परता. नंतर त्यात कालवलेले बेसन हळूहळू ओता आणि सतत ढवळत राहा म्हणजे गुठळ्या होणार नाहीत. मिश्रण घट्ट होईपर्यंत आणि बेसन शिजेपर्यंत मध्यम आचेवर शिजवा. वरून कोथिंबीर घाला. तयार बेसन मटकी भाकरी किंवा चपाती बरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### जिमची योग्य दिशा

✻ जर तुम्हाला व्यायामाचा पूर्ण फायदा घ्यायचा असेल तर मशीन अशी लावा की व्यायाम करताना तुमचे तोंड आपोआप पूर्व किंवा उत्तर दिशेला होईल.

✻ जिम मध्ये फक्त हनुमानजींचा छोटा फोटो दक्षिण भिंतीवर लावू शकता. याने ताकद आणि शिस्त दोन्ही राहते. आत येताना उजव्या हाताला गणेशजींचा फोटो लावला तर जिम मेंबर्स टिकून राहतात.

## सौंदर्य

एका वाटी खोबरेल तेलात १ चमचा कलौंजी (काळे जिरे) गरम करून गाळून घ्या. हे तेल आठवड्यातून २ वेळा मुळांना लावा – नवीन केस यायला मदत होते.

## सल्ला

टोमॅटो गॅसवर भाजून घ्या (काळा होईपर्यंत). साल काढून हाताने कुस्करा. त्यात भाजलेली हिरवी मिरची, कोथिंबीर, मीठ, जिरं ठेचून टाका. भात आणि पोळी सोबत भारी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६

**द्वादशी श्राद्ध, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, मघा २१।४१, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आज धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** आज जुने मित्र भेटतील. अडकलेले काम पूर्ण होईल.

**मिथुन :** आज मन प्रसन्न राहील. प्रवासातून लाभ होईल.

**कर्क :** आज खर्च वाढण्याची शक्यता आहे. जवळच्या व्यक्तीशी वाद होऊ शकतो.

**सिंह :** आज मान सन्मान वाढेल. नवीन कामाची सुरुवात होईल.

**कन्या :** आज आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. पैशाची चणचण जाणवेल.

**तुळ :** आज जोडीदाराची साथ मिळेल. व्यवसायात फायदा होईल.

**वृश्चिक :** आज शत्रूवर विजय मिळेल. कोर्टाच्या कामात यश मिळेल.

**धनु :** आज संततीकडून आनंद मिळेल. अचानक धनलाभ होईल.

**मकर :** आज मालमत्तेचा लाभ होईल. घरात शुभ कार्य घडेल.

**कुंभ :** आज भावंडांची मदत मिळेल. धाडस वाढेल.

**मीन :** आज वाणीवर नियंत्रण ठेवावे लागेल. नोकरीत बदल संभवतो.

## शब्दगंध क्र. ७५३१ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) दिवंगत व्यक्तीचा स्मृतिदिन ५) लोकसभा किंवा राज्यसभेचा सभासद ७) वाचन करणारा ८) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ ९) मैदा; सोजी १२) कमतरता; उणीव; कसर १३) मुसलमानी धर्मसूत्र १५) रट्टा; तडाखा १६) दणका; रट्टा; तडाखा १८) चमक; मुरगाळणे; उसण; मुरड १९) गळ्यात अडकवायची एक प्रकारची पिशव

शब्दगंध क्र. ७५३० चे उत्तर



**उभे शब्द :-** १) पुण्य करणारा; भाग्यवान २) थोडेसे तिरपे ३) कडक पाठ असलेला एक जलचर ४) पायऱ्या असलेली विहीर ५) मिठाची चव ६) करार; अवलंबन; भिस्त १०) ज्वारी वगैरे धान्य दळल्यानंतर तयार होते ते ११) वर फेकलेली वस्तू वरच्यावर हातात धरणे १२) एक सम संख्या; रावणाच्या तोंडांची संख्या १३) जास्तीतजास्त; अतिशयपणा १४) पुरेसे; नेमके; मोजके १५) उजेड १७) उत्साह; जोश; ताजेपणा; शक्ती

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** मेहनत ही अशी चावी आहे जी बंद असलेले प्रत्येक दरवाजे उघडू शकते, फक्त ती वापरण्याची हिंमत हवी.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कृष्णविवर (ब्लॅक होल) म्हणजे काय? तिथे काय असते?

रात्रीच्या आकाशाकडे पाहिल्यावर आपल्याला असंख्य तारे दिसतात पण याच आकाशात अशा काही जागा आहेत जिथे काहीच दिसत नाही जिथे अंधारच अंधार आहे आणि तो अंधार एखाद्या भुकेल्या राक्षसासारखा सगळ काही गिळून टाकतो त्यालाच आपण कृष्णविवर म्हणतो हे एखाद्या मेलेल्या मोठ्या ताऱ्यापासून तयार होते जेव्हा एखादा आपल्या सूर्यापेक्षा कित्येक पट मोठा तारा मरतो तेव्हा तो स्वतःमध्येच कोसळतो आणि इतका आकुंचन पावतो की त्याचे वजन अफाट वाढते आणि जागा अगदी छोटी होते मग त्याची ओढण्याची शक्ती इतकी प्रचंड होते की तिथून प्रकाश सुद्धा सुटू शकत नाही.

प्रत्येक कृष्णविवराभोवती एक अदृश्य सीमा असते या सीमेला पार केल्यावर परत फिरणे शक्य नसते ही एक अशी लक्ष्मणरेषा आहे जी एकदा ओलांडली की तुम्ही या जगापासून कायमचे तुटता बाहेरून पाहणाऱ्या एखाद्या व्यक्तीसाठी हा क्षण खूप विचित्र असतो समजा तुमचा मित्र कृष्णविवरात पडत आहे आणि तुम्ही दूर उभे राहून पाहत आहात तर तुम्हाला असे दिसेल की तुमचा मित्र हळूहळू सावकाश होत आहे त्याची गती कमी होत आहे आणि तो त्या सीमेवर गोठून गेला आहे तो आत जातच नाहीये असे वाटेल त्याचा चेहरा त्याचे हात तसेच थांबलेले दिसतील. खरे तर हा काळाचा खेळ आहे कृष्णविवर जवळ गेल्यावर काळाची गती मंदावते तुमच्या मित्राचा काळ तुमच्या काळापेक्षा खूप हळू चालू लागतो म्हणून तो थांबल्यासारखा वाटतो पण हा फक्त बाहेरून पाहणाऱ्याचा भास आहे.

आता तुमच्या मित्राला आतमध्ये काय वाटेल याचा विचार करा त्याला असे वाटणार नाही की वेळ थांबला आहे त्याच्यासाठी घड्याळ नेहमीसारखेच चालू राहील त्याला वाटेल की तो अगदी वेगाने आत पडत आहे. त्याच्यासाठी एक सेकंद म्हणजे एकच सेकंद असेल पण हाच एक सेकंद बाहेरच्या जगासाठी हजारो वर्षांइतका मोठा असेल म्हणजे तो आत एक क्षण जगेल तोवर बाहेर पृथ्वीवर अनेक पिढ्या जन्माला येतील आणि नष्ट होतील थोडक्यात बाहेरच्यासाठी तुमचा वेळ थांबतो पण तुमच्यासाठी बाहेरच्या जगाचा वेळ खूप वेगाने पळतो. आत पडताना शरीराचे काय होते हा भाग सगळ्यात जास्त भयानक आहे. कृष्णविवराची ओढण्याची शक्ती खाली जास्त आणि वर कमी असते त्यामुळे जर तुम्ही पायाच्या दिशेने पडत असाल तर तुमचे पाय डोक्यापेक्षा जास्त जोरात खेचले जातील तुमचे शरीर लांब होऊ लागेल अगदी रबरासारखे ताणले जाईल हाडे स्नायू सगळे लांब लांब होत जातील.

या वेदनेतून कोणीही वाचू शकत नाही आणि या सगळ्याच्या शेवटी काय आहे सर्वात आतमध्ये एक छोटासा बिंदू आहे जिथे सगळे काही एकवटलेले असते. तिथे जागा नाही वेळ नाही आपले विज्ञानाचे सगळे नियम तिथे कोलमडून पडतात तिथे काय आहे हे आजपर्यंत कोणत्याही माणसाला कळलेले नाही काही जण म्हणतात तिथून दुसऱ्या विश्वाचा दरवाजा उघडतो तर काही जण म्हणतात तिथे सगळ काही नष्ट होते पण सत्य हे आहे की तिथे गेल्यावर काय होते हे सांगायला आजवर कोणीही परत आलेले नाही म्हणूनच कृष्णविवर हे अजूनही एक न सुटलेले गूढ आहे जे आपल्याला विचार करायला लावते की आपण किती छोटे आहोत आणि हे विश्व किती मोठे आणि रहस्यमय आहे.

## गर्विष्ठ कळफलक

संगणकाच्या टेबलावर एक कळफलक रहात होता. त्याच्यावर दिवसभर टकटक आवाज चालायचा. लोक त्याच्यावरच काम करायचे, गाणी ऐकायचे, चित्रपट पाहायचे. हे पाहून कळफलकाला खूप गर्व झाला. एक दिवस तो शेजारच्या उंदराला म्हणजे माऊसला म्हणाला, अरे उंदरा, तुझी काय किंमत आहे? सगळे काम तर मीच करतो. लोक माझ्याच बटणांना दाबतात. या संगणकाचा खरा मालक मीच आहे. माऊस काही बोलला नाही.

मग तो पडद्याला –(स्क्रिनला) म्हणाला, अरे पडद्या, तू तर फक्त दाखवण्याचे काम करतोस. लिहितो तर मीच. माझ्याशिवाय तुझ्यावर एक अक्षर सुद्धा येणार नाही. पडदा पण शांत राहिला. कळफलकाचा गर्व दिवसेंदिवस वाढतच गेला. तो म्हणाला, मीच सगळ्यात मोठा, मी नसेन तर हा संगणक म्हणजे एक खोका आहे.

हे सगळे आतून यंत्राचा मुख्य भाग असलेला सीपीयू ऐकत होता. त्याला कळफलकाचा गर्व मोडायचा होता. दुसऱ्या दिवशी सकाळी मालकाने संगणक चालू केला. कळफलकाने नेहमीसारखे रुबाबात काम सुरु करायचा प्रयत्न केला. पण काय, त्याचे एकही बटण दाबले जाईना. आतून सीपीयूने त्याचे जोडणे थोड्या वेळासाठी बंद केले होते.मालकाने टकटक करून पाहिले, काहीच टाईप होईना. तो वैतागला आणि म्हणाला, हा कळफलक नासलाय वाटते आणि त्याने तो उचलून बाजूला ठेवला आणि कपाटातून दुसरा नवीन कळफलक आणून लावला. नवीन कळफलक लागताच संगणक परत सुरू झाला. बाजूला पडलेला जुना कळफलक रडू लागला.

तेव्हा माऊस जवळ आला आणि म्हणाला, मित्रा, या जगात कोणीच एकट्याने मोठे नसते. तू बटण दाबतोस, पण विचार सीपीयू करतो, दाखवतो पडदा, आणि मी जागा दाखवतो. आपण सगळे एकत्र असलो तरच संगणक चालतो. एकट्याचा गर्व हा असाच कोपऱ्यात पडतो. कळफलकाला आपली चूक कळली. संध्याकाळी मालकाने त्याला परत पुसून लावला तेव्हा तो अगदी नम्र झाला होता.

तात्पर्य – सांघिक कामातच खरी ताकद असते.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

अशा प्रकारे स्वाद घेणाऱ्या इंद्रियांना दारु पिण्याची खोड जडते अथवा खाद्य पदार्थांकडेच ओढा उत्पन्न होतो. त्यामुळे मादक, नशिली पदार्थ घेण्याची सवय जडते. कारण ते घेण्याने त्याला मानसिक वा अंतरीय सुखाचा भ्रामक अनुभव येतो. अनावर इच्छांच्या बाबतीत बौध्द शिकवणूक सांगते की, जो माणूस वैषयिक सुखाची साधने गोळा करतो त्याचे मन स्थिर राहत नाही, त्याच्या इच्छा कधीही तृप्त होत नाही. त्याला विनाशकारी सत्ता वश करून घेते. (धमपाडा ४८)

बायबलच्या नव्या करारात म्हटले आहे, जेव्हा कोणाची परीक्षा होते तेव्हा ती परीक्षा परमेश्वर घेत आहे असे तो म्हणू शकणार नाही.

कारण घाणेरड्या गोष्टींद्वारे परमेश्वराची परीक्षा होत नाही व तो स्वतः कुणाची परीक्षा घेत नाही. परंतु प्रत्येक मनुष्य आपल्याच अभिलाषेमुळे विषयांकडे ओढला जाऊन परीक्षेला सामोरा जातो. मग अशा अभिलाषा, वासना, पापांना जन्म देतात व जेव्हा ही पापे वाढतात, तेव्हा मृत्यु उत्पन्न करतात.'' (याकूब ह्यांची पत्री १.१३–१५)आणि ''दारु पिऊन बेधुंद बनू नका, कारण यामुळे व्यभिचार घडतात. तेव्हा आत्म्याशी पूर्णतः एकरूप व्हा!'' (इफिसियो ५.११–१२)बायबलच्या जुन्या करारात आले आहे.

''जे सकाळी उठल्यापासून रात्री उशीरापर्यंत दारू पीत राहतात, तिचा अंमल पूर्णपणे चढेपर्यंत. कोठीत वीणा, सारंगी, बासरी, डफ आणि दारू ह्या गोष्टी उपलब्ध होतात आणि जे यहोवाच्या हाताच्या काम कदर करीत नाहीत.'' (यशायाह ५–११–१२) जोपर्यंत आम्हाला आत्म्याच्या परिपूर्णतेचा हा अनुभव येत नाही तोपर्यंत आम्ही बाह्यजगात समाधानाचा शोध घेत असतो.

बाह्य जगातील हा शोध दर्शवितो की आम्ही परमात्म्याशी संबंध जोडावयास अत्यंत आतुर आहोत.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

शिवानीदीदी : सर्वांत महत्त्वाचा आणि प्रत्येक नात्यात अनिवार्य असा एक घटक म्हणजे प्रामाणिकपणा.प्रामाणिकपणा म्हणजे आपण एकमेकांशी खरं बोलणं. पण त्याआधी आपण स्वतःशी खरं बोलायला हवं. माझे विचार, शब्द आणि कृती यांमध्ये सुसंगती आहे का हे तपासायला हवं. जर नसेल तर या तीन ऊर्जाक्षेत्रांत असलेल्या विसंगती मुळे माझ्या आत नेहमी संघर्ष राहील. मग बाह्य जगात सुसंगती निर्माण करणं मला शक्य होणार नाही कारण माझ्या नात्यांमध्ये विश्वास, प्रामाणिकपणा आणि एकनिष्ठता या गुणांचा अभाव असेल. जर मी स्वतःशी प्रामाणिक नसेन तर मी तुमच्याशी प्रामाणिक कशी असू शकेन? हे काहीसं असंच आहे की जर आपण स्वतःचा आदर करत नसलो तर इतरांचा आदरही करू शकणार नाही. किंवा जर आपण स्वतःवर प्रेम करत नसलो तर आपण इतरांवरही प्रेम करू शकणार नाही. म्हणूनच प्रामाणिकपणा खूप महत्त्वाचा आहे. आता तुम्ही दिलेलं उदाहरण बघू या. जर आपण एखाद्याला सांगितलं की त्याचे कपडे त्याला शोभत नाहीयेत, तर त्याला वाईट वाटू शकेल. याचं कारण, समोरचा मनुष्य त्याच्या आनंदासाठी आपल्यावर अवलंबून आहे. आपल्या परवानगीसाठी आणि प्रशंसेसाठी तो थांबला आहे. आयुष्यातील मोठ्या निर्णयांनाही हे लागू पडतं.

सुरेश ओबेरॉय : माझा नातू असं करतो. त्याने उडी जरी मारली तरी आम्ही त्याचं कौतुक करावं असं त्याला वाटतं.

शिवानीदीदी : आपल्या बालपणी आपण सगळे असंच शिकलेलो असतो. म्हणूनच हा धडा महत्त्वाचा आहे. तेच उदाहरण पुन्हा घेऊ या. आपण नवीन ड्रेस विकत घेतो, कार्यक्रमाला घालून जातो आणि मग इतरांनी त्या ड्रेसचं कौतुक करावं म्हणून वाट बघतो.

जर कोणी आपल्या ड्रेसबद्दल काही बोललं नाही तर बोलता बोलता आपण स्वतःहून तो विषय काढतो. लोकांनी त्या ड्रेसचं कौतुक करावं म्हणून आपण तिथेच थांबतो कारण इतरांनी कौतुक केल्याशिवाय आपली निवड योग्य आहे हे आपल्याला पटत नाही. जेव्हा लोक आपल्याला जाणवून देतात तेव्हाच आपल्याला स्वतःबद्दल खात्री वाटते. जर कोणी आपलं कौतुक केलं, मनापासून केलेलं असो अथवा नसो, की मग आपल्या आनंदाचा आलेख उंचावतो. याचा अर्थ, आपला आनंद लोकांच्या मतांवर अवलंबून आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : तू अर्धीच कॅडबरी का खाल्ली?

बायको : प्रेमात आणि कॅडबरीत माणूस स्वतःपेक्षा समोरच्याचा जास्त विचार करतो.

नवरा : खोटं! तू माझ्या अर्धीतला पण काजू काढून खाल्लास!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतात नोटबंदी कधी झाली होती?

– ८ नोव्हेंबर २०१६

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

टेस्टट्यूब बेबीचा दोनदा प्रयत्न करूनही गर्भधारणा झालेली नव्हती. जामखेडवरून ते दांपत्य टेस्टट्यूब बेबी करण्यासाठी पुण्यामध्ये वारंवार जात होते. हताश होऊन शेवटी ते संयुक्त उपचार पद्धतीकडे वळाले. तपासणीअंती त्या स्त्रीरुग्णाच्या दोन्ही बीजवाहिनी नलिका बंद आहेत असे लक्षात आले. मासिकपाळीच्या पाचव्या दिवसापासून तीन दिवसांपर्यंत मी तिला कासिसादी तेलाचा उत्तरबस्ती दिला. असे तीन महिने केले. त्याचबरोबर अभ्यंतरतः लेखन करणारे औषधी गुग्गुळकल्प चालू केला. पाच महिन्यांनंतर तिची दुर्बिणीद्वारे तपासणी केली असता, तिची एक बीजवाहिनी नलिका उघडलेली दिसली. स्त्रीरुग्णाला हे उपचार चालू असतानाच तिच्या पतीला वय जास्त असल्या कारणाने रसायन, वाजीकरण उपचार चालू केले. शिलाजित, गुळवेल, कवचबीज, मुसळी, अश्वगंधा, गोक्षुर यांनी युक्त शिलाजित कॅप्सुल्स चालू केल्या. तसेच दुर्वांकुर अमृत च्यवनप्राश देखील चालू केला. साधारणतः सहा महिन्यांनी उपचारानंतर गर्भधारणा झाली. गर्भधारणा झाल्यानंतर तिसऱ्या महिन्यात सोनोग्राफी केली असता तिला जुळी गर्भधारणा राहिली होती. ७ सप्टेंबर २००७ रोजी तिची प्रसूती झाली. अशा प्रकारे एक मुलगा–एक मुलगी अशी या दांपत्याला अपत्यप्राप्ती झाली. त्या दांपत्याचा आनंद पाहून आम्हाला देखील खूप आनंद झाला. आम्ही घेतलेल्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटत होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# अहिल्यानगरमध्ये नवमतदार नोंदणीसाठी विशेष उपक्रम

**नवमतदारांनी जास्तीत जास्त नोंदणी करण्याचे उपजिल्हाधिकारी सुधीर पाटील यांचे आवाहन**


अहमदनगर महाविद्यालयात आयोजित विशेष 'नवमतदार संवाद' कार्यक्रमात बोलताना सुधीर पाटील.

नगर – नवमतदार हेच आपल्या देशाचे खरे भवितव्य आहेत. त्यांच्या मनात मतदार नोंदणीविषयी आणि प्रक्रियेविषयी कोणतीही शंका राहू नये, यासाठी त्यांच्याशी थेट संवाद साधून शंकांचे निरसन करणे आणि जास्तीत जास्त नवमतदारांची नोंदणी करून घेणे, हाच या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी तथा अहमदनगर शहर मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी सुधीर पाटील यांनी केले.

अहमदनगर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष 'नवमतदार संवाद' कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

### सखोल मतदार पुनरीक्षण मोहीम

कार्यक्रमात बोलताना सुधीर पाटील यांनी मतदार यादीच्या अद्ययावतीकरणावर भर दिला. ते म्हणाले की, सखोल मतदार पुनरीक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा मतदार यादीतील त्रुटी दूर करणे हा आहे. मतदार यादीमध्ये मृत व्यक्ती, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेले नागरिक किंवा दुबार नोंदणी झालेले मतदार यांचा मोठा भरणा असतो. अशा नावांचा शोध घेऊन ती नावे मतदार यादीतून वगळणे आणि एक पारदर्शक व अचूक मतदार यादी तयार करणे हे आमचे प्राधान्य आहे.

### १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवकांना आवाहन

पुढील टप्प्यातील नोंदणीबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व नवमतदारांनी आपला हक्क बजावण्यासाठी फॉर्म नंबर ६ भरून मतदार यादीत आपले नाव नोंदवावे. सर्व पात्र तरुण–तरुणींनी उत्स्फूर्तपणे पुढे येऊन जास्तीत जास्त संख्येने मतदार नोंदणी करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अहमदनगर महाविद्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, उपप्राचार्य दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य विलास नाबदे, विनाअनुदानित विभागाचे समन्वयक डॉ. रज्जाक सय्यद, नायब तहसीलदार सुधीर उबाळे, बीएलओ पर्यवेक्षक संजय शिंदे तसेच राजू भोसले आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य विलास नाबदे यांनी केले, तर सूत्रसंचालन सेजल सोनवणे यांनी केले. या संवाद सत्राला महाविद्यालयातील तरुण विद्यार्थी व नवमतदार उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## बरवे बरवे केले विठोबा

"मुसाफिर" वाचनीय मननीय
संकलन: दिशान फिचर्स




आपल्या अंगी बळ म्हणून का इतरांचा करायचा छळ? केवढा रे तू खळ । अरे दुसरा या छळातून सुटेल, तेव्हा तुझे पाप लोकांना कळेल. छळ सोसणाऱ्याला लोकांची सहानुभूती मिळेल, तुझ्या तोंडाला मात्र काळं फासेल.

अरे सोनारा तुझ्याजवळ कसा नाही विचाराला थारा, सोनं हसून म्हणालं सोनाराला. सोनं पुढे म्हणालं, छळवादी माणसा शंभरदा टाकतोस अनीत मला आग होते अंगाची, पण केवढी स्तुती मिळते जगाची मी निघतो तावून सुलाखून पण छळवाद्या, तुला काय मिळाले यापासून ? घेतलेस राखेने तोंड काळे करून बसलास निखारे फुलवीत. नि उडाली कोळशांची राख

देहूगावच्या मंबाजीबोवाने तुकारामांचा अतोनात छळ केला. तुकारामांना शिव्या दिल्या. बाभळीच्या काटेरी फांदीने झोडपून काढले. संत तुकारामांनी त्यांचा मंजाबीने छळ केला म्हणून देवावर राग नाही. धरला. उलट म्हणाले, की देवा बरे केले. माझ्या अंगी सहनशीलता आहे की नाही, याची परीक्षा झाली. बरे झाले. संचित तसेच होते. भोगल्याविना का प्रारब्ध टळते? तेव्हा कुणाला बोल लावायचा? सुटलो प्रारब्ध यांच्या पाशातून म्हणून सुस्कारा सोडायचा. या दिव्यातून पार पडलो. पावन झालो. या छळातून केवढे वैभव मिळवून बसलो.

वैकुंठच अवतरले माझ्या घरी. माझ्या सुखला आता कशाची सरी? तिकडे मंबाजी मात्र तळमळतो घरी. अहो, त्या संतासी म्या छळिले उगा परोपरी । देवा, तू हवी ती शिक्षा मला करी, मी पापी जरी मत तू उद्धरी ।

– किशोर गांधी


अहिल्यानगर येथील डॉ. योगेश बाफना यांना 'फार्मा मित्र' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# 'फार्मा मित्र' राष्ट्रीय पुरस्काराने डॉ. योगेश बाफना सन्मानित

नवी दिल्ली – फार्मसी शिक्षण, संशोधन व समाजाभिमुख कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अहिल्यानगर येथील डॉ. योगेश सुरेश बाफना यांना 'फार्मा मित्र' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान नवी दिल्ली येथे आयोजित National Pharma Summit 2026 या राष्ट्रीय अधिवेशनात प्रदान करण्यात आला.

फार्मालोक संस्थेच्या वतीने २७ सप्टेंबर रोजी भारतीय विद्यापीठ कॅम्पस, नवी दिल्ली येथे या राष्ट्रीय परिषदेत देशभरातील प्राध्यापक, संशोधक व फार्मसी क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते. या परिषदेत Advancing Pharmacy Education Practice : Innovation, AI Skill Development for Contemporary Healthcare in Viksit Bharat या विषयावर विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रांमध्ये फार्मसी शिक्षणातील आधुनिक प्रवाह, कृत्रिम बुद्धिमत्ता चा आरोग्य सेवेत वापर, विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास तसेच बदलत्या आरोग्य व्यवस्थेत फार्मासिस्टची भूमिका या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

डॉ. बाफना हे अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगरचे प्राचार्य असून त्यांनी गेल्या २२ वर्षांत फार्मसी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक संशोधन प्रकल्प, पेटंट्स, संशोधन निबंध तसेच विविध शैक्षणिक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच आरोग्य जनजागृतीसाठी त्यांनी योगदान दिले आहे.

# अहिल्यानगरच्या डॉ. सचिन उदमले यांचा प्रेसिडेंट अप्रिसिएशन ॲवॉर्डने सन्मान



भूलतज्ज्ञ डॉ.सचिन उदमले यांना राज्यस्तरीय गौरव प्रेसिडेंट अप्रिसिएशन अवॉर्ड तसेच अहिल्यानगर भूलतज्ज्ञ शाखेला मध्यम गटात राज्यात तृतीय क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट शहर शाखा पुरस्कार स्वीकारताना डॉ. उदमले. (छायाचित्र – समीर मन्यार)

नगर – वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल करणारे अहिल्यानगरचे भूलतज्ज्ञ व अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. सचिन उदमले यांना महाराष्ट्रातील भूलतज्ज्ञांच्या राज्यस्तरीय संघटनेच्या सॅम्सकॉन–२०२६ परिषदेत अध्यक्षांचा प्रशंसापर राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या अहिल्यानगर च्या भूलतज्ञ शाखेला मध्यम गटात राज्यात तृतीय क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट शहर शाखा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला.

महाराष्ट्रातील भूलतज्ज्ञांची राज्यस्तरीय परिषद सॅम्सकॉन–२०२६ दि. २, ३ व ४ ऑक्टोबर रोजी पाचगणी येथे सातारा जिल्हा संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला राज्यभरातून ८०० हून अधिक भूलतज्ज्ञ उपस्थित होते. वर्षभरातील शैक्षणिक उपक्रम, कार्यशाळा, जनजागृती आणि सामाजिक उपक्रमांच्या आधारे राज्यातील विविध शाखांमधून अहिल्यानगर शाखेची मध्यम गटात तृतीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली. डॉ. सचिन उदमले यांना अध्यक्षांचा विशेष प्रशंसापर पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. संघटनेसाठी असाधारण योगदान, निःस्वार्थ सेवा, सामाजिक उपक्रम, हृदय–फुफ्फुस पुनरुज्जीवनाचे (सीपीआर) प्रशिक्षण, जनजागृती तसेच रेडिओ आणि वृत्तपत्रांच्या माध्यमातून रुग्ण व डॉक्टर

### अहिल्यानगर भूलतज्ज्ञ शाखेला बेस्ट सिटी ब्रांच पुरस्कार

यांच्यातील संवाद वाढविण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश भोसले, उपाध्यक्ष डॉ. विकास कर्ने आणि सचिव डॉ. शितल दलाल यांच्या हस्ते राज्यभरातील भूलतज्ज्ञांच्या उपस्थितीत डॉ. उदमले यांचा गौरव करण्यात आला.

मुंबईवरील २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या काळात जखमींवर सलग तीन दिवस रात्रंदिवस उपचार करताना शस्त्रक्रियांसाठी भूल देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांनी पार पाडली. गेल्या १७ वर्षांपासून ते अहिल्यानगरमध्ये भूलतज्ज्ञ व अतिदक्षता तज्ज्ञ म्हणून सेवा देत आहेत. कोरोना महामारीच्या काळातही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अतिदक्षता विभागात अहोरात्र सेवा बजावत त्यांनी अनेक रुग्णांच्या उपचारात महत्त्वाची भूमिका निभावली.

२०२४ ते २०२६ या कालावधीत 'एएसए अहिल्यानगर'चे सचिव म्हणून डॉ. उदमले यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाखेच्या वतीने विविध शैक्षणिक, सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. या कार्याची दखल घेत अहिल्यानगर शाखेला राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला.

मार्गदर्शक डॉ. श्रीकांत मोने, एमएसआयएसएचे माजी अध्यक्ष डॉ. मिलिंद पोळ, एएसए अहिल्यानगरचे अध्यक्ष डॉ. राहुल एरंडे, डॉ.नीलिमा उदमले, हृदयरोग तज्ञ डॉ. बापूसाहेब कांडेकर, आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी, माजी अध्यक्ष डॉ. चंद्रवदन मिश्रा, डॉ. संगीता कुलकर्णी तसेच सभासदांनी उदमले यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जपानच्या हिरायामा अझुमी यांची न्यू आर्टस् महाविद्यालयाला भेट

**कॅसासचे विद्यार्थी गिरवत आहेत जपानी भाषेचे धडे**


जपानच्या भाषा शिक्षिका हिरायामा अझुमी यांनी जॅपनीज लँग्वेज टीचर्स असोसिएशन, पुणे यांच्या वतीने अहिल्यानगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) च्या सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स्ड स्टडीज इन अप्लाइड सायन्सेस (कॅसास) ला प्रथमच भेट दिली.

नगर – जपानच्या भाषा शिक्षिका हिरायामा अझुमी यांनी जॅपनीज लँग्वेज टीचर्स असोसिएशन, पुणे यांच्या वतीने अहिल्यानगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) च्या सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स्ड स्टडीज इन अप्लाईड सायन्सेस (कॅसास) ला प्रथमच भेट दिली. कॅसास अंतर्गत बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी.एस्सी. डेटा सायन्स, बी.एस्सी. क्लाउड कॉम्प्युटिंग आणि बीसीए या विभागांतील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी जपानी भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविला जात आहे. एक वर्ष कालावधीचा हा अभ्यासक्रम दोन सत्रांमध्ये, दोन भागांत शिकविला जात असून या उपक्रमांतर्गत ही भेट आयोजित करण्यात आली.

यावेळी हिरायामा अझुमी यांनी विद्यार्थ्यांना अगदी सोप्या आणि सहज पद्धतीने जपानी भाषेचे धडे दिले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत त्यांना दिलखुलास प्रतिसाद दिला. भाषेबरोबरच जपान, तेथील खाद्यसंस्कृती आणि राहणीमान यावर त्यांनी विद्यार्थ्यांशी सखोल संवाद साधला. आपल्या मनोगतात त्यांनी जपानी भाषा अवगत असलेल्या आयटी व्यावसायिकांना जपानमध्ये तसेच जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. जपानमधील अनेक कंपन्या तांत्रिक कौशल्यासोबत जपानी भाषेचे ज्ञान असणाऱ्या मनुष्यबळाच्या शोधात असतात, त्यामुळे भाषा शिकणे हे करिअरसाठी महत्त्वाचे पाऊल ठरते, असे त्यांनी नमूद केले. जपानमधील व्यक्तीशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचा हा विद्यार्थ्यांचा पहिलाच अनुभव असल्याने हा उपक्रम त्यांच्यासाठी अविस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरला.

विभागातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी ओम गणगणे हा स्टुडंट एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत मागील सत्रात नोव्हेंबर ते जानेवारी असे तीन महिने शिष्यवृत्तीसह जपानमध्ये अभ्यास व प्रशिक्षणासाठी गेला होता. त्याने या संवादादरम्यान आपले अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.

अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षिका श्रीमती वैदेही मुळे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यार्थी नियमित उपस्थित राहून मोठ्या उत्साहाने जपानी भाषा शिकत आहेत आणि अभ्यासक्रमाला त्यांचा प्रतिसाद अतिशय सकारात्मक आहे, असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांची ही आवड पुढील सत्रातही कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी कॅसास राबवत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेत विभागाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. आयटी क्षेत्रात तांत्रिक कौशल्यांसोबत परदेशी भाषेचे ज्ञान असल्यास विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवर करिअरची नवी दारे खुली होतात, असे त्यांनी सांगितले. जपानसारख्या तंत्रज्ञानात अग्रेसर देशात जपानी भाषा अवगत असलेल्या आयटी व्यावसायिकांना विशेष मागणी असल्याने विद्यार्थ्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास कॅसासचे विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे, अभ्यासक्रमाच्या समन्वयक प्रा. प्रियंवदा पाटील तसेच अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थी उपस्थित होते.


महानगरपालिकेच्या वतीने आयोजित शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा पोलीस परेड ग्राउंड येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन केले.

# मनपा शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूलचे मोठे यश

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा पोलीस परेड ग्राउंड येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन केले.

थाळीफेकमध्ये ईश्वरी सूर्यवंशी (अंडर १४) प्रथम क्रमांक, लांब उडी (अंडर १७) भार्गव पिंपळे प्रथम क्रमांक, गोळाफेक (अंडर १४)

श्रेया पितळे तृतीय क्रमांक, मुले रिले संघ (अंडर १७) भार्गव पिंपळे, अनुज दरेकर, आदित्य शिंदे आणि सम्यक छाजेड यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सराव यासोबतच क्रीडा शिक्षक जॉर्ज थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या अध्यक्षा मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, ट्रस्टी निर्मल मुथा आणि अमित मुथा, प्राचार्या दीपिका नगरवाला यांनी या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत विद्यार्थी व मार्गदर्शक यांचे अभिनंदन केले.



कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ आंतरशालेय स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले.

# कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ आंतरशालेय स्पर्धांचे उत्साहात उद्घाटन

नगर – कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ ३५ व्या आंतरशालेय स्पर्धांचे उद्घाटन ५ ऑक्टोबर रोजी अ.ए.सो. ची बाई इचरजाबाई फिरोदिया प्रशाला, नवीपेठ, अहिल्यानगर येथे फिरोदिया कुटुंबातील ज्येष्ठ सदस्या ललिता फिरोदिया, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, संस्थेच्या विश्वस्त श्रीमती सुनंदाताई भालेराव सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, वेगवेगळ्या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून आमंत्रित ऋतुजा पाठक, अनुजा कुलकर्णी, श्रीमती उषा सारसर, अमोल शिंदे, कु. मैथिली जोशी, सौ. सोनाली बोरा, सौ. पूजा चंगेडिया, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.ज्योती सिसोदियांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला.

या उद्घाटन प्रसंगी श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतातून सांगितले की, अनेक वर्षांपासून या स्पर्धांमध्ये शहरातील अनेक शाळा उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवितात याचा आनंद वाटतो. कै. बाई इचरजबाई यांचे या शाळेशी खूप ऋणानुबंध होते. या स्पर्धा पार पाडण्यासाठी प्रशालेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अथक परिश्रम घेतात. स्पर्धेत विद्यार्थी चांगली तयारी करून येतात यासाठी विद्यार्थी व पालकांचे कौतुक वाटते सदर प्रसंगी संस्थेच्या तसेच अहिल्यानगर शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, पूर्व प्राथमिक वर्गांचे इन्चार्ज, पालक, विदयार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक वैभव वाघ यांनी तर आभार प्रदर्शन सौ. शकुंतला देसर्डा यांनी केले.

चार दिवस चालणाऱ्या या आंतरशालेय स्पर्धेत चित्रकला, रांगोळी, फॅन्सी ड्रेस, नृत्य, कथाकथन, गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सौ. ज्योती सिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत कर्नल परब्स स्कूलचे यश

**२ सुवर्ण, ४ रौप्य व १ कांस्यपदक प्राप्त**


कर्नल परब्स स्कूल – अ गुरुकुल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सीआयएससीई राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत दैदिप्यमान यश संपादन केले आहे.

नगर – कर्नल परब्स स्कूल – अ गुरुकुल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सीआयएससीई राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत जबलपूर, मध्य प्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकूण २ सुवर्ण, ४ रौप्य आणि १ कांस्यपदकासह एकूण ७ पदके पटकावून शाळेच्या क्रीडा परंपरेत बहुमानाची भर घातली आहे.

देशभरातून सहभागी झालेल्या खेळाडूंसमोर कर्नल परब्स् स्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा कौशल्य, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या बळावर यशस्वी कामगिरी केली. स्पर्धेतील विविध गटांमध्ये ईश्वरी जाधव आणि आराध्या खंडेलवाल यांनी सुवर्णपदक पटकावून राष्ट्रीय विजेतेपद संपादन केले. काव्या खिळे, अनय परदेशी, वेदांत बडे आणि अर्णव निकरड यांनी उपविजेतेपद मिळवत रौप्यपदकावर आपले नाव कोरले, तर श्रीराज सुरवसे याने कांस्यपदक प्राप्त केले. तसेच सिया अडसुरे आणि प्रद्युम्न शेळके यांनी राष्ट्रीय स्तरावर शाळेचे अधिकृत प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय स्तरावर अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या विजेत्या विद्यार्थ्यांचे व प्रशिक्षकांचे कर्नल परब्स् स्कूलच्या संस्थापिका सौ. गिता परब, संचालक दिलीप परब, रिकीराज परब आणि मुख्याध्यापिका कु. अर्पिता रणनवरे, शिक्षकवृंद व पालकांनी विजयी खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

या यशामागे त्यांचे अथक परिश्रम, सराव, आणि शाळा व्यवस्थापनाद्वारे उपलब्ध करून दिलेल्या भौतिक सुविधा आणि प्रशिक्षक गणेश खडका व उस्मान शेख यांचे तांत्रिक मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.

# जितो मुंबई क्वीन्स नेकलेस युवा अध्यक्षपदी अहिल्यानगरचे ॲड.साहिल बोरा यांची निवड



नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) मुंबई क्वीन्स नेकलेस युवा शाखेच्या अध्यक्षपदी २०२६–२०२८ या कार्यकाळासाठी ॲड. साहिल बोरा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अधिवक्ता, आयपीओ सल्लागार तसेच भारतीय जनता युवा मोर्चा, दक्षिण मुंबईचे सचिव म्हणून कार्यरत आहे.

ॲड. साहिल बोरा हे अहिल्यानगरचे रहिवासी असून, त्यांचे वडील समीर बोरा हे देखील सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. ते जैन ओसवाल पतसंस्थेचे विद्यमान संचालक तसेच जैन ओसवाल युवक संघाचे माजी अध्यक्ष आहेत. अहिल्यानगरपासून सुरू झालेला त्यांचा मुंबईपर्यंतचा प्रवास हा केवळ शहर बदलण्याचा नसून, कर्तृत्वाच्या बळावर स्वतःची ओळख निर्माण करण्यासोबतच समाजासाठी योगदान देण्याचा आहे.

ॲड. साहिल बोरा म्हणाले, अहिल्यानगरपासून सुरू झालेला माझा प्रवास आज मुंबईत जितो मुंबई क्वीन्स नेकलेस युवा शाखेची जबाबदारी स्वीकारण्यापर्यंत पोहोचला, हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. हे केवळ पद नसून युवकांसाठी काम करण्याची मोठी जबाबदारी आहे. माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाला कामातून न्याय देत युवकांसाठी आणि समाजासाठी नेहमीप्रमाणे कार्यरत राहीन.

# ‘कौन बनेगा कर्मा विजेता?’मध्ये खुशबू मुथाने पटकावले १ लाखांचे बक्षीस



नगर – कर्म विषयाच्या अभ्यासासाठी ‘अर्हम विज्ञा’ टीमच्या वतीने ‘कौन बनेगा करोडपती’च्या धर्तीवर ‘कौन बनेगा कर्मा विजेता?’ या गेम शोचे आयोजन करण्यात आले. ‘सीक्रेट ऑफ कर्मा’ अंतर्गत समर्पण चातुर्मास या उपक्रमात झालेल्या या कार्यक्रमाला प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत अहिल्यानगरच्या खुशबू मुथा हिने उत्कृष्ट कामगिरी करत एक लाख रुपयांचे कॅश प्राईज पटकावले. सोनल गांधी हिने पाच हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले.

कर्म विषयाच्या स्पर्धा साठी विशेष अभ्यासक्रम देण्यात आला होता. त्यावर आधारित प्रश्नांच्या माध्यमातून ‘कौन बनेगा कर्मा विजेता?’ हा गेम शो रंगला. कार्यक्रमात "Fastest Finger First' या फेरीद्वारे स्पर्धकांची निवड करण्यात आली. त्यानंतर विविध फेऱ्यांमध्ये प्रश्न विचारण्यात आले. पाच राऊंडमध्ये एकूण १०० विजेत्यांना गिफ्ट व्हाउचर देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान प्रेक्षक मधूनही मध्येच प्रश्न विचारण्यात आले. या प्रश्नांची योग्य उत्तरे देणाऱ्या प्रेक्षकांनाही बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे स्पर्धेचा उत्साह आणखी वाढला आणि उपस्थित प्रेक्षकांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

या संपूर्ण उपक्रमासाठी फाल्गुनी मेहेर, पूनम भंडारी आणि सुरूची गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे व नगर टीमने दोन महिन्यांहून अधिक काळ अथक परिश्रम घेतले. तसेच समर्पण चातुर्मास समिति चे आदेश चंगेडिया यांचे मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले.

कार्यक्रमासाठी मनीषा बोगावत व अनिता सेठिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी समर्पण चातुर्मास समितिचे अध्यक्ष अशोक बाबूशेठ बोरा, तसेच ट्रस्टी विजय गुगळे, राजू बोरा, विलास कटारिया, सचिन देसर्डा आदी उपस्थित होते. तसेच मागील वर्षाची कर्मा विजेती साची धाडिवाल हिचीही विशेष उपस्थिती होती.

सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले.



‘हॅकथॉन २०२६’ स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी उपस्थित आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील. समवेत प्राध्यापकवृंद, विजेता आणि उपविजेता संघ.

# आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये आयोजित ‘हॅकथॉन २०२६’ स्पर्धेला प्रतिसाद

चास – आडसूळ टेक्निकल कॅम्पस, चास येथे ‘हॅकथॉन २०२६’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला प्रतिसाद मिळाला. ‘हॅकथॉन’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील तसेच सामाजिक व औद्योगिक क्षेत्रातील विविध समस्यांचा तांत्रिक दृष्टिकोनातून विचार करून त्यावर नाविन्यपूर्ण उपाययोजना विकसित करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी संगणक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट तसेच डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकल्प व संकल्पना सादर केल्या. स्पर्धे–दरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनांचे सादरीकरण करताना समस्या ओळख, त्यावरील तांत्रिक उपाय, प्रकल्पाची उपयुक्तता, कार्यपद्धती आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यता याबाबत माहिती दिली. विविध विद्यार्थी संघांनी उत्साहाने सहभाग घेत आपल्या कल्पकतेचे आणि तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ म्हणाले, हॅकॅथॉनमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे मी अभिनंदन करतो.

आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत १५ हून अधिक संघांनी भाग घेतला होता ज्यामध्ये ८९ हुन अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत मेधा झा यांचा ’बंबलबीज’ हा संघ विजेता तर प्रफुल्ल खर्डे यांचा ’हॅक हस्टलर्स’ हा संघ उपविजेता ठरला. ’बंबलबीज’ या संघात मेधा झा, भक्ती शिवगण, अंजली गुंजाळ, वैष्णवी हिवरकर, शर्वरी धोकटे, एंजल कांबळे सहभागी झाल्या होत्या तर ‘हॅक हस्टलर्स’ या संघात प्रफुल्ल खर्डे, दिशा क्षीरसागर, शर्वरी ढोकटे, प्रिया जवळकर, संस्कृत रासने, ओंकार महाडिक सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मुन्ना कुमार, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. नितीन पवार आणि डॉ. जावेद शेख, आयटी विभाग प्रमुख प्रा. स्वीटी वनवे यांनी काम पहिले. स्पर्धेच्या समन्वयक म्हणून आर्टिफिशीयल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स विभागप्रमुख प्रा. जागृती महाजन यांनी काम पहिले.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ‘कल्पनेपासून प्रत्यक्ष प्रकल्पापर्यंत’ काम करण्याचा अनुभव निर्माण झाला. हॅकथॉनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील तांत्रिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळाली. मागील वर्षी आडसूळ टेक्निकल कॅम्पसमधून करण गाडेच्या नेतृत्वाखालील ’कोड क्राफ्टर’ या संघाची अंतिम फेरीसाठी निवड झाली होती. या संघाने ’कमी इंटरनेट सुविधा असलेल्या भागांमधील आशा कार्यकर्त्यांसाठी मोबाइलवर आधारित सहाय्यक प्रणाली’ या संकल्पनेवर आधारित प्रकल्प तयार केला होता.

विजेत्या आणि उपविजेत्या संघांचे आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ, सचिव सौ. लीना आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, डॉ. कल्पना आडसूळ, सौ. रत्ना आडसूळ आणि सौ. पायल आडसूळ, प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील, आडसूळ पॉलीटेक्निकचे प्राचार्य डॉ. रमेश गडाख यांनी अभिनंदन केले.

# ज्येष्ठ कवयित्री हेमलता गीते यांचा ‘भारत गौरव श्री’ पुरस्काराने सन्मान

### साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल; नवी मुंबईत अभिनेत्री आशा ज्ञाते यांच्या हस्ते गौरव



ज्येष्ठ कवयित्री हेमलता गीते यांचा ‘भारत गौरव श्री’ पुरस्काराने सन्मान करण्यात आला.



नगर – येथील ज्येष्ठ कवयित्री तथा माजी प्राचार्या हेमलता प्रदीप गीते यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत नवी मुंबई येथील कला साधना सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांना ‘भारत गौरव श्री’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कामोठे, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात अभिनेत्री आशा ज्ञाते यांच्या हस्ते हेमलता गीते यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी माजी प्राचार्य डॉ. रत्नाकर अहिरे, जादूगार सतीश देशमुख, कला साधना सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष मेघा महाजन, श्रीराम महाजन उपस्थित होते.

हेमलता गीते या मराठी साहित्यविश्वात संवेदनशील, अभ्यासू आणि प्रभावी कवयित्री म्हणून परिचित आहेत. आपल्या लेखणीतून विविध सामाजिक, मानवी आणि भावनिक विषयांना त्यांनी सातत्याने अभिव्यक्ती दिली आहे. त्यांच्या कवितांमध्ये संवेदनशीलता, सामाजिक जाणिवा आणि जीवनानुभवांचे प्रतिबिंब दिसून येते. कविता लिहिण्याबरोबरच त्या प्रभावी काव्यवाचक म्हणूनही रसिकांमध्ये विशेष परिचित आहेत.

उत्कृष्ट काव्यलेखन, प्रभावी काव्यसादरीकरण आणि ललित साहित्य निर्मिती या क्षेत्रांमध्ये हेमलता गीते यांनी केलेल्या भरीव कार्याची विविध संस्थांनी दखल घेतली आहे. त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीत आजवर सुमारे दीडशेहून अधिक पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानामुळे त्यांनी मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. दिल्ली येथील दलित साहित्य अकादमीचा प्रतिष्ठेचा ‘वीरांगना सावित्रीबाई फुले फेलोशिप अवॉर्ड’ यासह विविध मानाचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. काव्यलेखनासोबतच साहित्यवाचन, काव्यसादरीकरण आणि ललित लेखनाच्या माध्यमातून त्यांनी साहित्य रसिकांशी सातत्याने संवाद साधला आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही प्राचार्या म्हणून कार्य करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले. शिक्षण आणि साहित्य अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव करणारा ‘भारत गौरव श्री’ पुरस्कार हा त्यांच्या प्रदीर्घ साहित्यसेवेचा सन्मान म्हणून प्रदान करण्यात आला आहे.

# राजेंद्र चोपडा व राजेंद्र गांधी यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ७ ऑक्टोबर रोजी इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय, नगर येथे कार्यक्रम

### उपस्थित राहण्याचे डी. एम. कुलकर्णी यांचे आवाहन





नगर – अहिल्यानगरमधील नगर अर्बन मल्टिस्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेचे लायसन्स रद्द झाल्यानंतर सर्व ठेवीदारांना त्यांच्या ठेवींचे पैसे मिळवून देणे, गैरकारभार केलेल्या संचालकांवर गुन्हे दाखल करण्याचे धाडस दाखवले ते आपल्या सर्वांचे स्नेही राजेंद्र गांधी ६१ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. तसेच त्यांच्याबरोबर खांद्याला खांदा लावून लढणारे राजेंद्र चोपडा हे ७१ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. अर्बन बँक ठेवीदार व मित्रपरिवारातर्फे या दोघांचाही अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती या सोहळ्याचे अध्यक्ष डी. एम. कुलकर्णी यांनी दिली.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, आमदार संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून सीए एस. झेड. देशमुख हे मार्गदर्शन करणार आहेत. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान उद्योगपती श्रीगोपाल धूत, भूषवणार आहेत अशी माहिती सत्कार सोहोळा समितीचे उपाध्यक्ष भास्कर नजन यांनी दिली.

७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय, कोठी रोड येथे हा सोहळा पार पडणार आहे. यावेळी मित्रमंडळी, नातेवाईक यांनी सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन सत्कार सोहोळा समितीचे सचिव अवधूत कुक्कडवाल यांनी केले आहे.

# ‘बालक मंदिर महिला मंडळ’तर्फे जागतिक शिक्षक दिन व मातृदिन साजरा



नगर – दिल्लीगेट येथील बालक मंदिर महिला मंडळ शाळेमध्ये ५ ऑक्टोबर रोजी महिला मंडळ संस्थेतर्फे जागतिक शिक्षक दिन व मातृदिनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर धनंजय जाधव तसेच माजी न्यायमूर्ती चंद्रचूड गोंगले हे होते. त्यांच्या पत्नी सौ.चित्रा गोंगले व बहीण सौ. शोभा मुळे याही उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला मंडळाच्या सेक्रेटरी सौ. ज्योती कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सौ. मीनल गंधे व पत्रकार शिल्पा रसाळ यांनी करून दिला. आदर्शमाता म्हणून सौ. मंगल गाजरे यांचा सत्कार झाला. त्यांचा परिचय सौ. उमा देशमुख यांनी करून दिला. यावेळी पाहुणे चंद्रचूड गोंगले यांचा महिला मंडळाच्या सेक्रेटरी सौ. ज्योती कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपमहापौर धनंजय जाधव यांचा सत्कार संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बालक मंदिर महिला मंडळ शाळेतर्फे निसर्ग वाचवा भविष्य घडवा हे पर्यावरण विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले. हे पथनाट्य सौ. शूळ अस्मिता, सौ. मनिषा कुलकर्णी व श्रीमती निरुपमा देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथनाट्य सादर केले.

यावेळी बोलताना चंद्रचूड गोंगले यांनी मराठी माध्यमाच्या शाळांचे महत्त्व विशद केले. तसेच या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्कार अतिशय चांगले असतात व हे विद्यार्थी भविष्यात चांगल्या पद्धतीने नावा रुपाला येतात आणि समाजाची सेवा करतात असे सांगितले.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी प्रत्येकाने पथनाट्यातील संदेशाचे पालन करावे असे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी शाळेत शिक्षकांचे आणि घरी आपल्या मातांचे व्यवस्थित ऐकले तर आयुष्यात नक्कीच चांगली प्रगती कराल असे त्यांनी नमूद केले.

यावेळी महिला मंडळ संस्थेतर्फे बालक मंदिर महिला मंडळ शाळेतील शिक्षिकांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी शिक्षिकांच्या वतीने सत्काराला उत्तर दिले.

शाळेतील विद्यार्थीकल्याणासाठी चंद्रचूड गोंगले यांनी शाळेला ११००० रुपयांची देणगी दिली. संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. विद्या होलेहुन्नूर यांनी आभार मानले. संस्थेच्या सदस्या पुष्पा चितांबर यांचा सहस्त्रचंद्र दर्शना निमित्ताने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मेधा धोपावकर यांनी केले.

यावेळी गौरी मुळे, अनुराधा देशमुख, सौ. स्मिता देशमुख पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली.

# वि. ल. कुलकर्णी शाळेतील निबंध स्पर्धेत ईशिका चिलकाने पटकावला तृतीय क्रमांक



नगर – पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवा निमित्त आयोजित निबंध स्पर्धेत वि.ल. कुलकर्णी प्राथ. शाळे तील इ. ७वी ची विद्यार्थिनी कु. ईशिका राहुल चिलका हिने तृतीय क्रमांक पटकावला. श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल नेप्ती नाका येथे झालेल्या बक्षीस समारंभात महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे याच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व फेटा बांधून तिला सन्मानित करण्यात आले. पर्यावरण पूरक गणेशोत्सव या विषयावर तिने निबंध लेखन करून पर्यावरणाच्या रक्षणातील आपली जबाबदारी स्पष्ट केली.

या यशासाठी संस्थेचे पदाधिकारी अध्यक्षा विजयाताई रेखे, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, सेक्रेटरी किरण वैकर, खजिनदार उमेश रेखे, कार्यकारिणी सदस्य महेश रेखे, उदयकुमार भणगे, उमेश नगरकर, शालेय समिती सदस्य विठ्ठल धिमते, हेमंत जोशी व श्रीमती पद्मजा बोर्डे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. भारदे व सर्व शिक्षकांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले.



महाराष्ट्र शासनाचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा व अखिल भारतीय शूर महाराणा प्रताप ट्रस्टचे संस्थापक आर पी सिंग व तीन पद्मश्रींच्या हस्ते अहिल्यानगर येथील पै. पांडूरंग सहादू गुंजाळ यांना ‘आज का कर्मवीर’ पुरस्काराने गौरविण्यात आले.



पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर व ताल चक्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ‘त्रिधा’ या गायन वादन व नृत्याच्या अनोख्या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

# ‘त्रिधा’ अभिजात शास्त्रीय संगीताच्या मैफिलीस नगरकरांचा प्रतिसाद

नगर – पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर व ताल चक्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ‘त्रिधा’ या गायन वादन व नृत्याच्या अनोख्या मैफलीचे आयोजन नुकतेच माऊली सभागृह येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पूर्वार्धात पद्मश्री पं.विजय घाटे (तबला), कथक नृत्यांगना शीतल कोलवालकर, गायक नागेश आडगावकर, हार्मोनियम वादक माधव लिमये तसेच सागर पटोकर यांनी ताल – रूपक मध्ये तबला व कथक नृत्याचा एक वेगळा कलाविष्कार सादर केला. त्याला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते, किराणा घराण्याचे गायक पं. आनंद भाटे यांनी राग – मारूबिहागने आपल्या गायनाची सुरुवात केली. त्यानंतर मिश्र रागातील ठुमरी तसेच वद जाऊ कुणाला शरण हे नाट्यगीत व भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांनी अजरामर केले जो भजे हरी को सदा या भैरवीने मैफलीची सांगता केली आणि आपल्या बहारदार गायनाने रसिक प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. त्यांना तबल्यावर सागर पटोकर, हार्मोनियमवर माधव लिमये, टाळावर आनंद कुलकर्णी यांनी समर्पक साथसंगत केली.

तसेच या कार्यक्रमात ज्या संगीत साधकांनी आपली संगीत साधना चालू ठेऊन १० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त केले अशा भैरवी हिरवे, ऋचा शेपाळ, उर्वी भावे, आर्या भालेराव, अक्षरा जाधव, मनस्वी गंधे, मनीषा नकाते, राधिका पेहरे, श्रीराम खांदवे, पूर्वा लकारे, श्रद्धा शिंदे, संयुक्ता झावरे, निधी गुप्ता, अन्वी मुरूमकर या संगीत साधकांचा सन्मान पं. आनंद भाटे यांच्या हस्ते करण्यात आला.

सर्वप्रथम नरेशकुमार दुबे, सत्येन हाडवळे, संदीप काळे, अमोल गवळी, प्रसन्न पाठक, अविनाश शिरापूरी, ज्ञानेश शिंदे, ॲड. स्वप्नील व प्रसाद निंबाळकर, डॉ.शाम गायकवाड, डॉ.नीरज करंदीकर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रास्तविक पर भाषणात बोलताना प्रसाद सुवर्णपाठकी म्हणाले की, अनाहत एक कलासृष्टी या संस्थेने मागील तीन वर्षात दर्जेदार कार्यक्रमांची मेजवानी नगरकर रसिकांना दिली आहे. नगरमधील दानशूर रसिक आणि मान्यवरांच्या सहकार्य आणि मार्गदर्शनामुळे या संस्थेला 80G प्रमाणपत्र तसेच भारती विद्यापीठाच्या विभागाचे विविध कोर्सेस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. जी नगरच्या संगीत संस्थांच्या इतिहासात प्रथमच घडलेली बाब आहे.

विलास बडवे, चंद्रकांत पंडित, किशोर कुलकर्णी, ओंकार देऊळगावकर, संकेत सुवर्णपाठकी, कल्याणी कामतकर, अभिजित अपस्तंभ, दीप्ती करंदीकर, संदिप कुलकर्णी व प्रसाद सुवर्णपाठकी यांच्या हस्ते कलाकार व प्रायोजकांचे सन्मान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले. अनिकेत देऊळगावकर, किरण डीडवाणिया व अमृता बेडेकर यांनी कलाकारांचा परिचय करून दिला. अनुजा कुलकर्णी यांनी आभार मानले. गीतांजली सगम व गायत्री धनलगडे यांनी कार्यक्रमाला साजेशी रांगोळी रेखाटन केले. ध्वनी व्यवस्था अवधूत गुरव यांची होती.

या कार्यक्रमास अशोक गांधी, अरविंद पारगावकर, अशोक गुर्जर, अभिजित पाठक, श्रीराम तांबोळी, पवन नाईक, गौतम मुनोत, मंगेश निसळ, गौरव मिरीकर, सत्येन हाडवळे, संदीप काळे, भूषण भणगे, अभय जोशी, अविनाश देऊळगावकर, अनघा पछाडे आदी उपस्थित होते.

गणेश बैरागी, सौरभ साठे, श्रेया सुवर्णपाठकी, अमित डोंगरे, वैष्णवी कुलकर्णी, सोहम सौंदणकर, श्रद्धा देऊळगावकर, अक्षय ताठे, ऋतुजा पाठक, रश्मी गंधे, रामेश्वर ढोरे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# कॉर्न आलू मसाला चाट

झटपट रेसिपी



एखाद्या निवांत संध्याकाळी मित्रमंडळींसोबत गप्पांचा फड जमवताना काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. एखाद्या चाट पदार्थामुळे तोंडाला छान चव येते. अशावेळी झटपट तयार होणारी कॉर्न आलू मसाला चाट ही रेसिपी तुम्ही ट्राय करू शकता.

**सामग्री :** एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, उकडलेल्या बटाट्याचे काप एक कप, दोन टोमॅटो, एक टेबलस्पून आल्याची पेस्ट, अर्धा टेबलस्पून हळद, प्रत्येकी एक टेबलस्पून जिरेपूड, धनेपूड आणि लाल तिखट, मॅगी मसाल्याचं एक पाकीट, चिमूटभर हिंग, दोन हिरव्या मिरच्या, अर्ध लिंबू, चिरलेली कोथिंबिर, तीन चमचे तेल, चवीनुसार मीठ

**कृती :** टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात जिरेपूड घालून मंद आचेवर परतून घ्या. आता त्यात हिंग, आल्याची पेस्ट, हिरवी मिरची घालून परता. यानंतर टोमॅटो, हळद, धनेपूड, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. टोमॅटो नीट शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजल्यावर त्यात स्वीट कॉर्न आणि बटाटे घालून हलवून घ्या. कढई झाकून ठेवा. पाच मिनिटांनंतर मध्यम आचेवर कॉर्न-बटाट्याचं मिश्रण परतून घ्या. मग त्यात मॅगी मसाला घालून हलवून घ्या. गॅस बंद करून लिंबाचा रस आणि कोथिंबिर घाला. कॉर्न आलू चाट तयार आहे. त्यावर शेव आणि कांदा घालून खाता येईल.




# 30 हजारांमध्ये उभारला उद्योग

अचिव्हर



व्यवसाय यशस्वी करायचा असेल तर मोठं भांडवल भरीव गुंतवणूकीची साथ असणं गरजेचं आहे; पण भोपाळमधील एका युवकाने या समजुतीला छेद दिला. अभिषेक साहूने फक्त ३० हजार रुपयांचं कर्ज घेत व्यवसाय सुरू केला. 'सोशल मीडिया'च्या जोडीनं त्याच्या व्यवसायाला गती मिळाली. आणि बघता बघता गर्दी वाढायला लागली. आता तो २५ लाखांची उलाढाल करतो.

अभिषेक मूळचा भोपाळमधील विदिशा जिल्ह्यातील रामपूर गावचा आहे. १५ वर्षांपूर्वी आपल्या कुटुंबासह भोपाळला स्थायिक झाला. सुरुवातीला त्याने एक इंटरनेट कॅफे चालवला; पण मोबाईल फोन आणि ऑनलाइन सेवांच्या वाढत्या वापरामुळे त्याला तो व्यवसाय बंद करावा लागला. मग अभिषेकने पुढे काय करावं, या विचारात लहानपणीच्या छंदाला व्यवसायात बदलण्याचा निर्णय घेतला. त्याला लहानपणापासून स्वयंपाक करायची खूप आवड होती. यूट्यूबवरील विविध पाककृती पाहून तो सँडविच बनवायला शिकला. त्याच्या कुटुंबाला त्याचं सँडविच खूप आवडायचं. त्यांनी त्यात काही बदल सुचवले आणि त्यानंतर अभिषेकने स्वतःचा स्ट्रीट फूड व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि 'हरी हर सँडविच' नावाची एक फूड कार्ट सुरू केली.

सुरुवात केली तेव्हा अगदी छोट्या स्वरुपात व्यवसाय होता; पण अभिषेकने 'सोशल मीडिया'चा वापर केला. त्याने आपल्या सँडविच गाडीचा एक साधा रील इन्स्टाग्रामवर पोस्ट केला. काही वेळातच तो रील चांगलाच व्हायरल झाला. यानंतर त्याच्या सँडविचला मागणी वाढली. भोपाळच्या विविध भागांमधील लोक सँडविच खायला त्याच्याकडे येऊ लागले. आज त्याच्या गाडीसमोर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा दिसतात. अनेक ग्राहक एका सँडविचसाठी तासभर थांबायलाही तयार असतात. हरि हर सँडविचची लोकप्रियता बरीच वाढली आहे. दररोज ६०० हून अधिक सँडविच विकले जातात. वीकेंडला हा आकडा एक हजारांहून अधिक सँडविचपर्यंत पोहोचतो. या व्यवसायाची मासिक उलाढाल सुमारे २५ लाख रुपये असल्याचं सांगितलं जातं. हरि हर सँडविचचं वैशिष्ट्य म्हणजे सध्या इथे एकाच प्रकारचं सँडविच मिळतं, तरी लोक या सँडविचचा अस्वाद घ्यायला लांबून येतात.

## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में,
जो तू मेरा हमसफर हो जाए,
बित जाए पल भर में ये वक्त,
और हसीन सफर हो जाए।

मैं चुप कराता हूं, हर
शब उमडती बारिश को,
मगर ये रोज, गई बात
छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक
से इशारे अक्सर, कितनी
खामोश मोहब्बत की
जुबान होती है।

# 'नील' अर्थव्यवस्थेत रोजगारसंधी

रोजगारवाटा



भारत 'महासागर व्हिजन'अंतर्गत सागरी सुरक्षा, तंत्रज्ञान, स्टार्टअप्स आणि 'नील' अर्थव्यवस्थेवर अधिक भर देत असताना पाण्याखालील क्षेत्रातील रोजगार, नवकल्पना आणि आर्थिक विकासाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील झपाट्याने विस्तारत असलेल्या 'अंडरवॉटर डोमेन' अर्थात पाण्याखालील व नील अर्थव्यवस्था क्षेत्रात २०३० पर्यंत आणि त्यानंतर तरुणांसाठी लाखो रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, पाण्याखालील डेटा विश्लेषण, हवामान बदल, मत्स्यपालन, गोड्या पाण्याचे व्यवस्थापन, गाळ व्यवस्थापन, शहरी पूर व्यवस्थापन आणि सागरी पायाभूत सुविधा यांसारख्या नव्या क्षेत्रांमुळे करिअरच्या अनेक नव्या वाटा तरुण पिढीसाठी खुल्या होत आहेत.

भविष्यात अंडरवॉटर डोमेन क्षेत्रामध्ये तरुण पिढीला मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. सागरी क्षेत्र आणि मत्स्यपालन क्षेत्रामध्ये प्रगत विज्ञान, तंत्रज्ञान आणि डिजिटल उपाययोजनांचा वापर करून उत्पादकता, शाश्वतता आणि हवामान बदलाला तोंड देण्याची क्षमता वाढविण्यास मोठा वाव आहे. खोल समुद्रातील खनिज उत्खनन हेही एक उदयोन्मुख क्षेत्र असून, त्यामध्ये भारताने देशांतर्गत कौशल्य विकसित करून बाह्य क्षमतांवरील अवलंबित्व कमी करण्याची गरज आहे. आंतर्देशीय जलवाहतूक आणि दळणवळणाच्या विस्तारामुळेही रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

भारतात सुमारे २० हजार किलोमीटर लांबीच्या जलमार्गांचा विकास केला जात आहे. किनारपट्टी व्यवस्थापन, गाळाचा अभ्यास आणि अँटी-फाऊलिंग तंत्रज्ञान हीदेखील विशेष कौशल्याची गरज असलेली क्षेत्रे आहेत. कौशल्यातील ही दरी भरून काढण्यासाठी 'मेरिटाइम रिसर्च सेंटर'ने चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम विकसित केला आहे. या अभ्यासक्रमात नील अर्थव्यवस्था (ब्ल्यू इकॉनॉमी), हवामान बदल, गाळ व्यवस्थापन, गोड्या पाण्याचे व्यवस्थापन, पाण्याखालील ध्वनी व्यवस्थापन आणि एआय आणि पाण्याखालील डेटा विश्लेषण अशा सहा विशेष अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

या अभ्यासक्रमांना रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे. हे अभ्यासक्रम बहुविषयक ज्ञानासोबत व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यावर भर देतात. संबंधित क्षेत्रातील भागधारक, नव्याने निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी आणि उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना रोजगारासाठी सक्षम करण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे. 'मेरिटाइम रिसर्च सेंटर'ने 'एआय आणि अंडरवॉटर डेटा ॲनालिटिक्स' या विषयातील सहा महिन्यांचा विशेष अभ्यासक्रमही सुरू केला आहे. पुण्यातील कोरेगाव भीमा येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या माध्यमातून हा अभ्यासक्रम ऑनलाइन, ऑफलाइन आणि हायब्रीड पद्धतीने उपलब्ध आहे. तरुणांना उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये प्रवेश करण्यास सक्षम करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

# सिम कार्डचा कोपरा का कापतात?

मोबाईल मॅनिया



आपण अनेक गोष्टी नियमितपणे वापरत असतो; मात्र त्या वस्तूसंदर्भात काही गमतीशीर गोष्टींची आपल्याला माहिती नसते. मोबाईलमध्ये सीमकार्डचा वापर वर्षानुवर्ष होत आहे; मात्र ९९ टक्के लोकांना हे माहीत नाही, की सीमकार्डचा एक कोपरा कट का केलेला असतो? त्यामागे काय कारण आहे? सीमकार्ड ही एक अशी वस्तू आहे, जिचा वापर लाखो लोक आपल्या मोबाईलमध्ये करतात.

सीमशिवाय कोणताही मोबाईल चालूच शकत नाही. तज्ज्ञांच्या मते या प्रकारे डिझाइन करण्यामागे सीम योग्य प्रकारे फीट व्हावे, हा त्यामागचा उद्देश आहे. त्यामुळेच सीमकार्डचा एक कोपरा कापलेला असतो. सीम कार्डचा एक कोपरा कापल्यामुळे हे लोकांच्या लवकर लक्षात येते, की कार्ड कोणत्या दिशेने बसवले आहे. मोबाईलमध्ये सीम उलटे लावल्यास मोबाईल चालणार नाहीच, पण सीमकार्ड खराबही होऊ शकते. सीम कार्डचे पूर्ण नाव 'सबस्क्रायबर आयडेंटिटी मॉड्यूल' असे आहे. हे सीमकार्ड मोबाईल डिव्हायसच्या सेल्युलर नेटवर्कला कनेक्ट करावे लागते. सीममध्ये 'इंटरनॅशनल मोबाईल सबस्क्रायबर आयडेंटिटी' (आयएमएसआय) नंबर आणि त्याच्याशी संबंधित कीज असतात. त्यामुळे सीम चालू झाल्यानंतर मोबाईल नीट काम करतो आणि आपण हवे त्याला फोन करू शकतो.

## टेक्नो टॉक



### 'एआय'च्या मदतीने मेंदूची शस्त्रक्रिया

वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आता आणखी एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. जगात पहिल्यांदाच 'एआय' च्या मदतीने मेंदूची नाजूक शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शस्त्रक्रियेमुळे एका ४८ वर्षीय रुग्णाची दृष्टी वाचवण्यात यश आले.

ब्रिटनमधील 'नॅशनल हॉस्पिटल फॉर न्यूरॉलॉजी अँड न्यूरोसर्जरी' (एनएचएनएन) येथे ही शस्त्रक्रिया करण्यात आली. 'यूसीएल'च्या संशोधकांनी विकसित केलेल्या 'एआय' तंत्रज्ञानाचा यासाठी वापर करण्यात आला. हे तंत्रज्ञान वैद्यकीय चाचणीचा भाग असून त्यासाठी 'एनआयएचआर' कडून निधी देण्यात आला आहे. बेडफर्डशायर येथील रिस हिबर्ट यांच्या मेंदूमध्ये ट्यूमर होता. या ट्यूमरमुळे त्यांच्या दृष्टीला धोका निर्माण झाला होता. शस्त्रक्रिया न केल्यास पुढे त्यांची दृष्टी जाऊ शकली असती; मात्र डॉक्टरांनी यशस्वीपणे ट्यूमर काढला आणि त्यांची दृष्टी सुरक्षित ठेवली. या पद्धतीने 'एआय'च्या मदतीने शस्त्रक्रिया करून घेणारे रिस हे पहिले रुग्ण ठरले आहेत.

शस्त्रक्रिया सुरू असताना 'एआय'ने थेट सर्जिकल व्हिडीओचे विश्लेषण केले. मेंदूच्या तळाशी असलेल्या महत्त्वाच्या रचना ओळखण्यासाठी 'एआय'ने डॉक्टरांना मदत केली. या भागात पिट्यूटरी ग्रंथी, रक्तवाहिन्या आणि दृष्टी नियंत्रित करणाऱ्या नसांचा समावेश असतो. हे भाग एकमेकांच्या अगदी जवळ असल्याने शस्त्रक्रियेदरम्यान अगदी काही मिलीमीटरची चूकही गंभीर ठरू शकते. 'एआय' ने डॉक्टरांना कोणते भाग धोकादायक आहेत हे ओळखण्यास मदत केली. त्यामुळे ट्यूमरचा जास्तीत जास्त भाग काढताना महत्त्वाच्या नसांना आणि इतर रचनांना इजा होऊ नये, यासाठी मदत मिळाली. हे 'एआय' तंत्रज्ञान 'यूसीएल हॉक्स इन्स्टिट्यूट'मधील संशोधकांनी विकसित केले आहे. यासाठी शेकडो जुन्या शस्त्रक्रियांचे व्हिडीओ वापरून 'एआय'ला प्रशिक्षण देण्यात आले. भविष्यात अशा तंत्रज्ञानामुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमध्ये डॉक्टरांना रिअल-टाइम माहिती आणि मार्गदर्शन मिळण्याची शक्यता आहे.

## स्मार्ट गॅजेट्स




### स्मार्टवॉच अशी मोजते पावले!

आजच्या आधुनिक काळात स्मार्टवॉच फक्त वेळ पाहण्याचे साधन राहिलेले नाही, तर ते एक महत्त्वाचे फिटनेस ट्रॅकर बनले आहे. दिवसभरात तुम्ही किती पावले चाललात, किती अंतर कापले आणि किती कॅलरीज बर्न केल्या, याचा अचूक डेटा स्मार्टवॉच काही सेकंदांमध्ये स्क्रीनवर दाखवते; पण अनेकदा स्क्रीनवर ५,००० किंवा १०,००० पावलांचा आकडा पाहिल्यानंतर, या छोट्याशा उपकरणाला आपण खरोखर किती चाललो हे कसे कळते, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण प्रक्रियेमागे स्मार्टवॉचमध्ये असणारे अत्याधुनिक सेन्सर्स, फिल्टर तंत्रज्ञान आणि स्मार्ट सॉफ्टवेअर अल्गोरिदम एकत्रितपणे काम करतात.

स्मार्टवॉचमध्ये पावले मोजण्यासाठी 'थ्री-ॲक्सिस ॲक्सिलरोमीटर' हा सर्वात महत्त्वाचा सेन्सर असतो. हा सेन्सर तुमच्या मनगटाच्या तीन दिशांमधील (एक्स, वाय आणि झेड ॲक्सिस) हालचाली आणि वेगातील बदल सतत नोंदवत असतो. जुन्या पेडोमीटर उपकरणांमध्ये यासाठी मेकॅनिकल स्विच वापरले जायचे; पण आताच्या स्मार्टवॉचमध्ये अत्याधुनिक एमईएमएस (मायक्रो-इलेक्ट्रो-मेकॅनिकल सिस्टीम्स) सेन्सरचा वापर केला जातो. ते कमी बॅटरी वापरून अतिशय अचूक डेटा नोंदवतात.

सेन्सर सतत कच्चा डेटा गोळा करतो; परंतु हाताची प्रत्येक हालचाल म्हणजे 'पाऊल' नसते. त्यामुळे स्मार्टवॉचमधील सॉफ्टवेअर 'लो-पास' आणि 'हाय-पास' फिल्टरचा वापर करून निरुपयोगी हालचालींचा डेटा बाजूला काढते. यासोबतच 'गायरोस्कोप' हा सेन्सर मनगटाची दिशा आणि फिरण्याचा वेग ओळखतो. यामुळे गाडी चालवताना किंवा हात सहज हलवताना झालेली हालचाल आणि खरोखर चालणे यातील फरक ओळखणे शक्य होते.

आपण चालतो किंवा धावतो तेव्हा शरीराच्या आणि हाताच्या हालचालीचा एक विशिष्ट पॅटर्न (उतार-चढ) तयार होतो. स्मार्टवॉच या पॅटर्नमधील वेगाची कमाल मर्यादा ओळखते. जेव्हा ही हालचाल ठरवून दिलेल्या 'स्टेप थ्रेशोल्ड' पेक्षा जास्त असते आणि दोन पावलांमधील वेळेचे अंतर नियमानुसार असते, तेव्हा सॉफ्टवेअर त्याला 'एक पाऊल' म्हणून स्वीकारते. स्मार्टवॉचमधील 'डायनॅमिक थ्रेशोल्ड' तंत्रज्ञानामुळे तुम्ही हळू चालत असाल किंवा वेगाने धावत असाल, तरीही प्रत्येक स्थितीनुसार पावलांची अचूक गणना केली जाते. अशा प्रकारे सर्व डेटा एकत्र करून वॉच स्क्रीनवर पाच हजार पावलांचा अंतिम आकडा दाखवला जातो.

# आराम आणि फॅब्रिकला प्राधान्य

फॅशन पॅशन



पावसाळ्यातील दमट वातावरण आणि सतत बदलणाऱ्या तापमानामुळे पुरुषांच्या फॅशनमध्ये यंदा केवळ ट्रेंडपेक्षा आरामदायक, उपयुक्त आणि हवामानाला अनुरूप कपड्यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. हलके फॅब्रिक, रिलॅक्स्ड फिट आणि स्मार्ट-कॅज्युअल पोशाख पुरुषांच्या मॉन्सून वॉर्डरोबचा महत्त्वाचा भाग बनत आहेत.

पावसाळ्यात कॉटन, लिनन आणि हलके कॉटन-ब्लेंड दैनंदिन वापरासाठी चांगले पर्याय ठरत आहेत. ऑफिस किंवा बाहेर जाण्यासाठी हलका शर्ट आणि ट्राऊझरचे कॉम्बिनेशन आरामदायक असण्याबरोबरच स्मार्ट लूकही देते. अतिशय घट्ट कपड्यांऐवजी रेग्युलर आणि रिलॅक्स्ड फिट कपड्यांना यंदा पसंती मिळत आहे. 'ओव्हरसाइज्ड शर्ट', 'रिलॅक्स्ड टी-शर्ट' आणि 'स्ट्रेट-फिट ट्राउझर कॅज्युअल लूक'साठी चांगले पर्याय आहेत. 'स्मार्ट लूक'साठी बेसिक टी-शर्टवर हलका शर्ट घालता येतो. ऑफिससाठी सॉलिड शर्टसोबत स्ट्रेट किंवा रेग्युलर फिट ट्राउझर वापरल्यास साधा आणि आकर्षक लुक मिळतो.

पावसाळ्यात जमिनीला घासणारे किंवा खूप लांब ट्राउझर त्रासदायक ठरू शकतात. त्यामुळे अँकल-लेन्थ किंवा स्ट्रेट-फिट पँट अधिक उपयुक्त ठरतात. चिनोज आणि हलक्या कॉटन ट्राउझर पोलो टी-शर्ट, शर्ट किंवा बेसिक टी-शर्टसोबत सहज वापरता येतात. जीन्स आवडणाऱ्यांसाठी स्ट्रेट किंवा रिलॅक्स्ड फिट चांगला पर्याय आहे. मात्र सततच्या पावसामध्ये डेनिम टाळणे सोयीचे ठरते.

मॉन्सून वॉर्डरोबमध्ये ऑलिव्ह ग्रीन, नेव्ही ब्लू, बेज, ब्राऊन, रस्ट आणि मस्टर्ड यांसारख्या अर्दी रंगांना पसंती मिळत आहे. पावसाळ्याच्या वातावरणाशी हे रंग चांगले जुळतात आणि दैनंदिन पोशाखातही उठून दिसतात. पांढरा, काळा आणि ग्रे यांसारखे क्लासिक रंगही नेहमीच उपयोगी ठरतात. प्रिंट्स आवडत असल्यास मोठे आणि छोटे प्रिंट किंवा मिनिमल डिझाइन निवडता येईल.

पावसाळ्यात वॉटर-रेझिस्टंट स्नीकर्स, रबर सोलचे शूज आणि योग्य फुटवेअर दैनंदिन वापरासाठी चांगले पर्याय ठरू शकतात. ऑफिससाठी हलका फॉर्मल शर्ट, चिनोज आणि साधे फुटवेअर यामुळे संतुलित लूक मिळू शकतो. वीकेंडला रिलॅक्स्ड शर्ट, बेसिक टी-शर्ट, स्ट्रेट-फिट पँट आणि स्नीकर्स यांचे कॉम्बिनेशन आरामदायक, तसेच स्टायलिश ठरते. पावसाळ्यात जास्त कपड्यांऐवजी एक-दोन योग्य कपडे निवडणे अधिक फायदेशीर ठरते. हलके जॅकेट किंवा ओव्हरशर्टही वापरता येऊ शकतो.

# अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षण!

एज्युकेशन न्यूज



देशभरातील शाळांच्या अभ्यासक्रमात सर्वसमावेशक लैंगिक शिक्षणाचा समावेश करण्यासाठी एक मोठा उपक्रम सुरू झाला आहे. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान केंद्र सरकारने सांगितले, की २६ सदस्यीय तज्ज्ञ समितीने आपला अहवाल सादर केला आहे. आता, न्यायालयाची मंजुरी मिळाल्यानंतर अंमलबजावणीची प्रक्रिया पुढे जाऊ शकते.

किशोरवयीन मुला-मुलींच्या गोपनीयतेच्या हक्काशी संबंधित या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि आर. महादेवन यांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करत आहे. शाळांमध्ये लैंगिक शिक्षणासाठी काय तयारी केली आहे, असेही न्यायालयाने केंद्र सरकारला विचारले. यावर सरकारने सांगितले, की तज्ज्ञ समितीने आपला अहवाल सादर केला असून अंतिम मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी केली जाईल. सुनावणीदरम्यान, न्यायालयाने विशेषतः १५ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलामुलींमधील परस्पर संमतीने होणाऱ्या संबंधांबद्दल चिंता व्यक्त केली. अशा प्रकरणांना गंभीर फौजदारी गुन्हे म्हणून वर्गीकृत करणे सर्व परिस्थितीत योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाचे मत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, केंद्र सरकारने महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली २६ सदस्यीय राष्ट्रीय तज्ज्ञ समितीची स्थापना केली. या समितीत 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'मधील तज्ज्ञ, क्लिनिकल मानसशास्त्रज्ञ आणि विविध मंत्रालयांचे प्रतिनिधी यांचा समावेश होता. किशोरवयीन मुलांना त्यांचे हक्क, लैंगिक सुरक्षा आणि पॉक्सो कायद्याबद्दल अधिक चांगल्या प्रकारे शिक्षित करण्यासाठी एक व्यावहारिक आराखडा तयार करण्याचे काम या समितीला सोपवण्यात आले होते. अहवालात म्हटले आहे, की प्राथमिक शाळेच्या स्तरापासूनच या विषयांसाठी तज्ज्ञ शिक्षकाची नियुक्ती करावी आणि आठवड्यातून दोनदा वीस मिनिटांचे वर्ग अनिवार्य करावेत.

# पर्यटनासाठी ऑफबीट स्टेशन्स!

भटकंती







पर्यटनाचा मनमुराद आनंद घेण्यासाठी गर्दी नसलेल्या शांत जागा शोधत आहात? मग उत्तराखंडचे चोपता, कर्नाटकचे अगुम्बे आणि हिमाचलच्या जलोरी पाससारख्या सहा ऑफबीट डेस्टिनेशन्सला नक्की भेट द्या. धुक्याची चादर आणि चोहोबाजूला पसरलेली हिरवळ यामुळे या जागा पावसाळ्यात अधिकच खुलून दिसतात.अशा हवामानात अनेकांना फिरायला जाण्याची तीव्र इच्छा असते; परंतु पर्यटनस्थळांवर होणारी प्रचंड गर्दी प्रवासाचा आनंद हिरावून घेते. तुम्हाला या मॉन्सूनमध्ये शांत, निसर्गरम्य आणि गर्दी नसलेल्या ठिकाणांना भेट द्यायची असेल, तर भारतातील सहा 'ऑफबीट डेस्टिनेशन्स' तुमच्या ट्रॅव्हल लिस्टमध्ये नक्कीच असायला हवेत. पावसात येथील सौंदर्य अधिकच खुलून दिसते.

### ताम्हिणी घाट

पुणे आणि रायगड जिल्ह्याला जोडणारा ताम्हिणी घाट हा महाराष्ट्रातील सर्वोत्तम मॉन्सून ड्राईव्ह स्पॉट्सपैकी एक आहे. पाऊस सुरू होताच या घाटात असंख्य लहान-मोठे पांढरेशुभ्र धबधबे जिवंत होतात. संपूर्ण घाटावर पसरलेली हिरवळ, डोंगरांना स्पर्श करणारे ढग आणि खळाळणारे पाणी यामुळे वीकेंडला जाण्यासाठी ही महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय ऑफबीट जागा ठरते.

### पंचमढी

मध्य प्रदेशमध्ये 'सातपुड्याची राणी' म्हणून ओळखले जाणारे पंचमढी हे एक अप्रतिम हिल स्टेशन आहे. पावसाळ्यात येथील बी फॉल्स आणि अप्सरा विहारसारखे धबधबे पूर्ण वेगाने वाहू लागतात. चोहोबाजूला दाट धुक्याची चादर आणि हिरवेगार डोंगर पर्यटकांना भुरळ घालतात.

### चोपता

उत्तराखंडमधील 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून प्रसिद्ध असलेले चोपता हे ट्रेकर्ससाठी नंदनवन आहे. पावसाळ्यात येथील मखमली गवताळ प्रदेश अत्यंत विलोभनीय दिसतात. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या शांत ठिकाणी पावसाच्या थेंबांसोबत पक्ष्यांचा किलबिलाट ऐकण्याचा अनुभव मनाला शांती देतो.

### अगुम्बे

कर्नाटकमधील सर्वाधिक पाऊस पडणारे ठिकाण म्हणून अगुम्बे ओळखले जाते, ज्याला 'चेरापुंजी ऑफ द साऊथ' असेही म्हणतात. पश्चिम घाटात वसलेले हे ठिकाण औषधी वनस्पती आणि घनदाट जंगलांसाठी प्रसिद्ध आहे. पावसाळ्यात येथील कुद्रेमुख आणि जोगीगुंडी धबधबे पाहणे, तसेच सनसेट पॉईंटवरून धुक्यात हरवलेला सूर्य पाहणे हा एक अद्भुत अनुभव असतो.

### मांडू

मध्य प्रदेश तुम्हाला निसर्गासोबतच इतिहासाची आवड असेल, तर मांडू हे उत्तम ठिकाण आहे. पावसाळ्यात या प्राचीन शहराचे सौंदर्य दुप्पट होते. राणी रूपमतीचा महाल आणि जहाज महाल या ऐतिहासिक वास्तूंच्या सभोवताली साचलेले पाणी आणि हिरवळ पाहून असे वाटते की आपण एखाद्या जुन्या काळातील चित्रपटात आलो आहोत.

### जलोरी पास

समुद्रसपाटीपासून सुमारे दहा हजार आठशे फूट उंचावर असलेला जलोरी पास हा हिमाचल प्रदेशातील एक छुपा खजिना आहे. पावसाळ्याच्या दिवसांत इथल्या देवदार आणि पाईनच्या झाडांवरून वाहणारे धुके आणि सभोवतालच्या दऱ्यांचे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडते. साहसी पर्यटकांना आणि शांतता प्रिय लोकांना ही जागा प्रचंड आवडते.

# विरोधात्मक गुंतवणूकीसाठी बाजाराची व्यवस्था



धीरज सारडा

जागतिक पातळीवरील इक्विटीचे नेतृत्व असामान्य प्रमाणात संकुचित झाले आहे. अमेरिकेत आता निर्देशांकामध्ये मूठभर मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांचा लक्षणीय वाटा आहे. त्यांच्या भारामुळे अमेरिकन मूल्यांकन ऐतिहासिक उच्चांकी पातळीवर पोहोचले आहे. जेव्हा बाजाराचा एवढा मोठा परतावा इतक्या कमी नावांवर अवलंबून असतो, तेव्हा अगदी चांगले व्यवसायही जी कामगिरी करतात त्यापेक्षा जास्त अपेक्षा ठेवण्यात येतात. अशा प्रकारचे एकवटलेपण बहुधा अशा ठिकाणी असते जिथे सहमतींची सर्वाधिक गर्दी असते, आणि विरोधात्मक दृष्टिकोनामध्ये नेमक्या गर्दीच्या व्यापाराविषयी औत्सुक्य असते.

भारतातील चित्र जवळजवळ उलट आहे. भारतीय इक्विटी गेल्या दोन वर्षांमध्ये डॉलरच्या संदर्भात अनेक जागतिक बाजारपेठांच्या तुलनेत मागे राहिली आहे, मात्र देशांतर्गत बाजारपेठेतील सहभाग संकुचित होण्याऐवजी व्यापक झाला आहे. विविध क्षेत्रांमधील परतावा संमिश्र आणि असमान आहे, काही क्षेत्र चांगले काम करत आहेत तर काही मागे राहिले आहेत.

व्यापक पार्श्वभूमी यात भरच घालते. जागतिक वाढीविषयीची चिंता, केंद्रीय बँकेच्या धोरणातील बदल, चलनातील चढ-उतार आणि परकीय गुंतवणूकदारांच्या प्रवाहातील भरती- ओहोटी या सर्व गोष्टींमुळे अव्यवस्था निर्माण होते. त्यामुळे किंमत आणि मूलभूत गोष्टी यांमध्ये अंतर निर्माण होते. यापैकी प्रत्येक गोष्टीमुळे व्यवसायाच्या दृष्टीने दीर्घकालीन अपेक्षा कायम राहिल्या, तरी अल्पावधीत भावनांना धक्का लागू शकतो. विरोधात्मक गुंतवणूकदार याचाच लाभ घेऊ पाहतो.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल कॉन्ट्रा फंड गुंतवणूकदारांना बाजाराच्या विविध चक्रांमध्ये चुकीच्या किंमतीच्या संधी ओळखण्यासाठी संशोधन-आधारित, गैर-सहमतीचा दृष्टीकोन उपलब्ध करून देते. त्याच्या शिस्तबद्ध चौकटीमध्ये मूल्यांकन, लीव्हरेज, मालकी, जमेच्या बाजू आणि व्यत्यय यावर लक्ष केंद्रित करण्यात येते. भावना आणि मूलभूत गोष्टी यांमध्ये वेळोवेळी अंतर निर्माण होते तेव्हा त्याद्वारे संधी शोधण्यात येते. नवीन फंड ऑफर १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत खुली आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ९ ऑक्टोबरला मोफत दंतरोग तपासणी व जन्मजात दुभंगलेले ओठ, टाळू शस्त्रक्रिया शिबीर



नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारा संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर येथे ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत दंतरोग तपासणी आणि जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली हे तपासणी शिबिर होईल. स्माईल ट्रेन प्रकल्पांतर्गत जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील.

हॉस्पिटल येथे अद्ययावत दंतोपचार सुविधा उपलब्ध आहेत. शिबिरात पूर्ण वेळ दंतरोग तज्ज्ञ डॉ. अर्पणा पवार (सकाळी १० ते ४), डॉ. प्राची गांधी (सायं. ५ ते ८), ऑर्थोडेंटिस्ट डॉ. कोमल ठाणगे, डॉ. अश्विनी बालगुडे, डॉ. राजलक्ष्मी राय, पिडियाट्रीक डेंटिस्ट डॉ. प्रणव डुंगरवाल, डॉ. तृप्ती डुंगरवाल, पेरिओ डेंटिस्ट डॉ. सुप्रिया कवडे, एण्डो डेंटिस्ट डॉ. पूजा गायकवाड, प्रोस्थो डेंटिस्ट डॉ. पारितोष वारे, ओरल सर्जन डॉ. स्वराज ठोले, मॅक्सिलोफेशिअल सर्जन डॉ. मृदुला मुळे रुग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. शिबिरात मेटल कॅप्र, सिरॅमिक कॅप्र, रूट कॅनल, दात साफ करणे, दातांची कवळी बसवणे, दातांमध्ये सिमेंट भरणे, इम्लांट इत्यादी उपचार सवलतीच्या दरात केले जातील. औषध खर्च वेगळा असेल.

हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ९५० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/ ७४/७५ / ७६.



## गुरुवाणी – ७२
## शुक्ल ध्यान

तुम्ही ज्याचे ध्यान करता तसे तुम्ही असता. तुमचे इमोशन, इन्फॉर्मेशन, अनुभव या तीन गोष्टी जिथे केंद्रीत होतात, त्याला ध्यान म्हणतात. कोणत्याही समस्येचं मूळ कारण ध्यान आहे आणि समस्येचे उत्तरही ध्यानातूनच मिळते. भगवान महावीर यांनी ध्यानाचे ४ प्रकार सांगितले. आर्त, रौद्र, धर्म आणि शुक्ल ध्यान. आर्त ध्यान म्हणजे दुःख, पीडा. या ध्यानाची ऊर्जा तुम्ही ग्रहण करता तेव्हा दुःखी होता. जे पाहिजे होते ते मिळाले नाही, जे नको होते ते पदरात पडले. आपण यावरच चिंतन करत बसतो. आजाराचा सतत विचार हे आर्त ध्यान आहे. रौद्र ध्यान म्हणजे कायम तक्रारी करणे, हिंसेशी नाते जोडणे. या ध्यानात क्रूरता, असत्य , चोरी असते. आर्त, रौद्र हे दोन ध्यान तन मन, नाते, आत्म्याला रोगी करतात. धर्म ध्यान हा समाधानाचा मार्ग आहे. देव गुरूंचे ध्यान जीवनातील संकटांवर मात करण्यासाठी उपाय देतात. मी सुखाचे बीज लावले तर अनंत सुख येईल. रात्री झोपताना तुमचा फोकस दिवसभरात झालेल्या निगेटिव्ह गोष्टींवर होतो, हे आर्त ध्यान आहे. जे चांगले आहे त्यावर फोकस करणे धर्म ध्यान आहे. दुःख, रोग अल्प असतात पण तुम्ही त्याला डोक्यावर बसवता. मग ते तुमच्यावर स्वार होणारच. घरात सगळीकडे साफसफाई होते. पण एका कोपऱ्यात थोडा कचरा राहतो. सगळा फोकस त्या थोड्या कचऱ्याकडे जातो. हे असते आर्त ध्यान. सुधर्मा स्वामी तीर्थंकरांच्या ध्यानाची चर्चा करतात. अनेक जण विचारतात भगवान महावीर कोणाचे ध्यान करायचे? ते शुक्ल ध्यान करायचे. ते चराचराच्या परम शुद्ध स्वरूपाचे ध्यान करतात. प्रत्येक वस्तू, व्यक्तीत श्रेष्ठता, शुद्धता आहे. त्यावर फोकस करणे म्हणजे शुक्ल ध्यान. हे ध्यान करताना अपार निर्जरा होते. तीर्थंकर निष्कलंक, शुभ्रतम ध्यान करायचे. ध्यान करताना सोप्या गोष्टी लक्षात ठेवा. तुम्ही ज्याची आठवण कराल तेच तुमच्याकडे आकर्षित होईल. तीर्थंकरांसमोर अर्जुन माली आला पण तीर्थंकर फक्त त्याच्यातील शुद्ध स्वरूपच पाहतात. तुम्हाला कोणत्याही आपत्तीतून बाहेर पडायचे असेल तर आगम आत्मसात करा. जोपर्यंत तुमचे शरीर स्थिर होत नाही तोपर्यंत तुमचे मन स्थिर होत नाही. हेच भगवान महावीर शिकवतात.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# मोहटादेवी नवरात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज

## प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी घेतला तयारीचा आढावा

नगर – पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा शारदीय नवरात्र महोत्सव ११ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. या पार्श्वभूमीवर देवस्थानच्या सभागृहात महोत्सवाच्या तयारीचा व मागील बैठकीत ठरलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक उपविभागीय अधिकारी तथा श्री मोहटादेवी यात्रा महोत्सवाचे नोडल अधिकारी प्रसाद मते यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



मोहटादेवी देवस्थान यात्रोत्सवाच्या तयारीसाठी आयोजित आढावा बैठकीसाठी प्रांताधिकारी प्रसाद मते, सुरेश भणगे, भिमराव खाडे, संदीप घुले, अॅड. विक्रम वाडेकर आदी.

महोत्सव कालावधीत विविध शासकीय विभागांनी करावयाची कामे व त्यांची जबाबदारी याबाबत प्रसाद मते यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आवश्यक कामांबाबत देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी माहिती दिली.

बैठकीस तहसीलदार उद्धव नाईक, पाथर्डी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे, पाथर्डी नगरपरिषद, राज्य परिवहन महामंडळ आगार, राष्ट्रीय महामार्गचे सी. लाड, तालुका आरोग्य विभाग, वनविभाग, उपजिल्हा रुग्णालय, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सय्यद, सार्वजनिक बांधकाम जि.प. विभाग, परिवहन विभागाचे प्रतिनिधी, महावितरणचे उपअभियंता अरविंद कुकडे, देवस्थानचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, अशोक दहिफळे, अॅड. विक्रम वाडेकर, बाळूशेट लाहोटी, बाबासाहेब दहिफळे, सरपंच मनिषा पालवे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले उपस्थित होते.

पाथर्डी शहरातील तसेच श्री मोहटादेवी मंदिराकडे येणाऱ्या सर्व मार्गांवरील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश देण्यात आले. भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मोहटादेवी रस्त्यावरील वनविभागाच्या जागेवरील अतिक्रमणे न हटवल्याबद्दल संबंधित विभागाला नोटीस काढण्याचे आदेश प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी दिले. तसेच बैठकीस उपस्थित न राहिल्याने वनपरीक्षेत्र अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि गटविकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेशही त्यांनी दिले.

श्री मोहटादेवी मंदिराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, साइड पट्ट्यांची दुरुस्ती करणे आणि मार्गालगतची अतिक्रमणे हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमणे हटवून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

पाथर्डी–मोहरी रस्ता तसेच मोहटादेवी पालखी मार्गावरील साइड पट्ट्यांची दुरुस्ती, आवश्यक ठिकाणी स्पीड ब्रेकर उभारणे, अग्निशमन वाहनांची उपलब्धता, फिरती शौचालये, रस्त्यांवर पुरेशी प्रकाशव्यवस्था आणि २४ तास वीजपुरवठा याबाबत नियोजन करण्यात आले.

भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाण्याची तपासणी, आरोग्य विभागामार्फत आवश्यक सुविधा, रुग्णवाहिका तसेच २४ तास ओपीडी सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उत्सव काळात भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन वाहतूक व गर्दीचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रास्ताविक अॅड. विक्रम वाडेकर यांनी केले. आभार ईश्वर गायकवाड यांनी मानले.

### गाभारा दर्शन बंद; पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

शारदीय नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत गाभारा दर्शन बंद राहणार असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले. घटस्थापना व पालखी मिरवणुकीसाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून महिला पोलीस, ट्राफिक पोलीस, एस.आर. पी., गृहरक्षक दल तसेच शीघ्रकृती दलाची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

### पाथर्डी आगारातून २४ तास जादा बससेवा

महोत्सव काळात पाथर्डी आगाराच्या वतीने २४ तास जादा बसेसची व्यवस्था करण्याचे ठरले. भाविकांसाठी सुलभ दर्शन व्यवस्था तसेच आवश्यक ठिकाणी ये–जा करण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्याबाबतही बैठकीत निर्णय घेण्यात आला.

# सिद्धार्थ मुथा यांना पीएचडी पदवी प्रदान

नगर – आंतरराष्ट्रीय बँकिंग क्षेत्रात कार्य करणारे सिद्धार्थ मुथा यांनी व्यावसायिक व्यवस्थापन या विषयावर संशोधन करून पुणे विद्यापीठाची पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. डॉ.सिद्धार्थ मुथा यांनी 'ए स्टडी ऑफ स्ट्रॅटेजीज अँड चॅलेंजेस ऑफ स्टार्टअप बिझनेसेस टू क्रिएट सक्सेसफुल बिझनेस मॉडेल्स विथ रेफरन्स टू द पुणे रीजन' या विषयावर सखोल संशोधन करून प्रबंध सादर केला होता. यासाठी त्यांना डॉ. गणेश पटारे यांनी मार्गदर्शन केले.



डॉ.सिद्धार्थ मुथा यांचे संशोधन व्यावसायिकांना मार्गदर्शक ठरणार आहे.

# हिंद सेवा मंडळाच्या कारभाराबाबत गंभीर तक्रारी

## शिक्षण विभागाच्या पत्रव्यवहारासह विविध अनियमिततांची चौकशी करण्याची राजेंद्र चोपडा व सुनिल रामदासी यांची मागणी

नगर – अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील सुमारे १०० वर्षांचा इतिहास असलेल्या हिंद सेवा मंडळ शैक्षणिक संस्था, (संस्था नोंदणी क्रमांक एफ–९) या संस्थेच्या गैरकारभाराबाबत गेल्या काही वर्षांत गंभीर, नियमबाह्य व कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आरोप संस्थेचे आजीव सभासद व माजी पदाधिकारी राजेंद्र कांतीलाल चोपडा (रा. सत्ता कॉलनी, अहिल्यानगर आणि सुनील भगवान रामदासी, रा. विवेकानंद चौक, गुजर गल्ली, अहिल्यानगर) यांनी केली आहे.

चोपडा व रामदासी यांनी म्हटले आहे की, आम्ही दोघेही संस्थेचे आजीव सभासद असून अनेक वर्षांपूर्वी संस्थेच्या विविध पदांवर कार्यरत राहून शिक्षण क्षेत्रात काम केले आहे. मात्र, गेल्या सात–आठ वर्षांत शिक्षण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले असताना कायद्यातील व नियमांतील तरतुदींचा आवश्यक अभ्यास न करता संस्थेचे तत्कालीन सचिव संजय जोशी, सहसचिव योगेश देशमुख, जे अकोले येथे वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत, तसेच काही संचालकांनी संस्थेचा कारभार केल्याचा आमचा आरोप आहे. या कारभारासंदर्भात आम्ही सातत्याने अभ्यासपूर्वक माहिती संकलित करून संबंधित शिक्षण विभागाकडे व शासनाच्या विविध स्तरांवर लेखी पत्रव्यवहार केला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संस्थेचे धर्मादाय आयुक्त कार्यालयातील चेंज रिपोर्ट वेळेत दाखल करण्यात आले नाहीत. संस्थेची सध्याची घटना व त्याअनुषंगाने संस्थेच्या कारभाराची कायदेशीर स्थिती याबाबतही प्रश्न निर्माण झाले आहेत. उपलब्ध माहितीनुसार काही चेंज रिपोर्टबाबत प्रतिकूल निर्णय झाल्याचे आमच्या निदर्शनास आले असून, त्याची अधिकृत व प्रमाणित स्थिती सर्व सभासदांसमोर स्पष्ट करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे. तसेच संस्थेमध्ये शिक्षण विभागाची आवश्यक मान्यता न घेता भरती झाल्याचा, नियमबाह्य पदोन्नती देण्यात आल्याचा तसेच शिक्षकांवर दबाव टाकून विविध ठिकाणी बदल्या करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. शिक्षकांची सेवा–ज्येष्ठता यादी नियमाप्रमाणे व संस्थास्तरावर तयार करून उपलब्ध करून देणे आवश्यक असताना ती योग्य पद्धतीने तयार करण्यात आली नाही किंवा वेळोवेळी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, असा आमचा आरोप आहे. त्यामुळे पदोन्नती, नियुक्त्या, बदल्या आणि इतर प्रशासकीय निर्णय मनमानी पद्धतीने झाले का, याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे.

संस्थेच्या विविध बांधकामांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, याची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये विविध प्रकारच्या अनियमितता अथवा आर्थिक गैरव्यवहार झाले आहेत का, याची स्वतंत्र लेखापरीक्षणाद्वारे तपासणी करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

संस्थेच्या श्रीरामपूर येथील शाळांमध्ये, विशेषतः दादा वामन जोशी विद्यालय आणि भी. रा. खटोड विद्यालयाशी संबंधित विविध प्रकरणे चर्चेत आली असून, त्यामध्ये कथित 'खिचडी प्रकरणा'चाही समावेश आहे. या सर्व बाबींची वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. संस्थेचे अहिल्यानगर येथील कार्यालय कॅन्टीनच्या शेजारी आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकींमध्ये शैक्षणिक विषय, शाळांची गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न आणि संस्थेच्या भविष्यातील शैक्षणिक नियोजनाला अपेक्षित प्राधान्य मिळते का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. बैठकीच्या वेळी नाश्ता, जेवण किंवा इतर आदरातिथ्याला अधिक महत्त्व दिले जाते आणि संस्थेचे कार्यालय शैक्षणिक कामकाजाच्या केंद्रापेक्षा गप्पागोष्टींचे ठिकाण बनल्याचे वातावरण दिसून येते, असा आरोप तक्रारदारांनी केला आहे. संस्थेच्या मालमत्तेबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाले असून त्याची स्वतंत्र तपासणी व्हावी, अशी मागणी आहे.

चोपडा व रामदासी यांनी सांगितले की, गेल्या आठ–दहा महिन्यांपासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, शिक्षण आयुक्त, शिक्षण सचिव, शिक्षण संचालक, पुणे, शिक्षण उपसंचालक, पुणे तसेच जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने लेखी पत्रव्यवहार केला आहे. आम्हाला उपलब्ध असलेली माहिती, कागदपत्रे व तक्रारी लेखी स्वरूपात साद केल्यानंतर काही बाबींमध्ये चौकशा सुरू झाल्या असून, त्या चौकशीदरम्यान काही गंभीर प्रशासकीय बाबी समोर आल्याचे आमचे म्हणणे आहे.

श्रीरामपूर येथेही विद्यार्थिनींच्या लैंगिक सुरक्षेशी संबंधित गंभीर तक्रारी व गुन्ह्यांच्या बाबी समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. एका शिक्षकाविरुद्ध अल्पवयीन मुलींशी संबंधित लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात पॉक्सो कायद्यांतर्गत कारवाई झाल्याचे तक्रारदारांनी म्हटले असून, या संदर्भातील अधिकृत पोलीस व न्यायालयीन नोंदी तपासाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ स्थानिक आमदार हेमंत ओगले यांनी मोर्चा काढल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच श्रीरामपूर येथील आणखी एका प्रकरणात अशा स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद झाल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या सर्व बाबी अत्यंत गंभीर असल्याने संस्थेच्या पातळीवर बालसुरक्षा, लैंगिक छळ प्रतिबंधक यंत्रणा आणि संबंधित कायदेशीर समित्यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही केली होती का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या सर्व तक्रारी व शिक्षण विभागाकडे झालेल्या पत्रव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर संस्थेतील काही शाळांच्या पातळीवर चौकशी करून आवश्यक असल्यास प्रशासक नियुक्तीबाबत कार्यवाही करण्याची शिफारस शिक्षण विभागाच्या स्तरावर करण्यात आल्याचे तक्रारदारांनी सांगितले आहे. त्यामुळे संस्थेमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात तक्रारी व प्रशासकीय प्रश्न निर्माण होत असताना त्याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आमच्या सातत्यपूर्ण पत्रव्यवहारानंतर संस्थेचे तत्कालीन सचिव संजय जोशी यांनी राजीनामा दिला असून त्यांच्या जागी सुमतीलाल कोठारी यांची सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. मोडक सर यांच्या दुःखद निधनानंतर अॅड. अनंत फडणीस यांची अध्यक्ष म्हणून आणि अनंत देसाई यांची कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. मात्र, या नियुक्त्यांना संस्थेच्या घटनेत स्पष्ट तरतूद आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला असून, संबंधित नियुक्त्यांचा कायदेशीर आधार सर्व सभासदांसमोर स्पष्ट करण्यात यावा, अशी मागणी आहे. या नव्या पदाधिकाऱ्यांकडून मात्र आम्हाला प्रामाणिक अपेक्षा आहे की, संस्थेमध्ये यापूर्वी झालेला कथित नियमबाह्य व अनियमित कारभार थांबवून संस्थेचे कामकाज नियमांनुसार, पारदर्शक पद्धतीने आणि शिक्षणाच्या गुणवत्तेला प्राधान्य देऊन चालविण्यात येईल, असे तक्रारदारांनी म्हटले आहे.

संस्थेचे सर्व रेकॉर्ड, सभासदांचे अर्ज, सभासद नोंदणी पुस्तके, रजिस्टर, पावती पुस्तके, ऑडिट रिपोर्ट, शिक्षण विभागाशी झालेला पत्रव्यवहार आणि संस्थेच्या प्रशासकीय निर्णयांशी संबंधित सर्व कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात या सर्व नोंदी पारदर्शकपणे उपलब्ध आहेत का, याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रत्येक संचालकाने संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचा अभ्यास करून जबाबदारीने भूमिका घेणे अपेक्षित असताना, केवळ बैठकीला उपस्थित राहणे, प्रसिद्धी मिळविणे, फोटो काढणे, राजकीय व्यक्तींना कार्यक्रमांना बोलावणे आणि त्याची प्रसिद्धी करणे यापेक्षा विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी ठोस काम होणे आवश्यक आहे, असे तक्रारदारांनी स्पष्ट केले आहे.


# अशी संधी पुन्हा नाही.. आजच संधीचा लाभ घ्या

## चंदुकाका ज्वेल्स् सावेडी येथे 'उत्सव मजुरीचा'

चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..

नगर – चंदुकाका ज्वेल्स सावेडी यांनी आपल्या ग्राहकांसाठी 'उत्सव मजुरीचा' ही योजनेचे आता शेवटचे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. या योजनेमध्ये सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर भरघोस सूट मिळणार आहे. या योजने अंतर्गत आपणांस १० ग्रॅम पर्यंत कोणताही दागिना खरेदी केल्यास त्यावर आपणांस मजुरीत १०% सूट मिळणार आहे. यामध्ये दागिना १ ग्रॅमचा असो कि १० ग्रॅमचा... मजुरीत १०% सूट ही मिळणारच.. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे १० ग्रॅमच्या वरील कोणत्याही वजनाचा दागिना तुम्ही खरेदी करा, त्या दागिन्याच्या वजनाएवढी मजुरीत आपणांस सूट देण्यात येईल. समजा आपण ५० ग्रॅम वजनाचा राणीहार खरेदी केला असेल तर आपणांस मजुरीत ५०% सुट देण्यात येईल किंवा १०० ग्रॅम वजनाची चेन खरेदी केली असेल तर आपणांस मजुरीत १००% देखील सूट देण्यात येईल. या उत्सव मजुरीचा या योजनेमुळे सुवर्णग्राहकांच्या सुवर्णखरेदी करतांना मजुरीमुळे खिशाला मोजावी लागणारी अधिकची किंमत आता कमी होणार आहे. तेव्हा या योजनेचा अधिकाधिक सुवर्णग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे. तसेच सदर योजना ही ८ ऑक्टोबर पर्यंतच लागू असणार आहे.

सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्स नेहमीच आपल्या आवडी निवडीनुसार, लेटेस्ट फॅशन प्रमाणे आपल्या दागिन्यांमध्ये बदल करून त्या ग्राहकांना अधिकाधिक कशा पसंत पडतील याकडे चंदुकाका ज्वेल्स्चे अधिक लक्ष असते. आपल्या वेगवेगळ्या योजनेव्दारे ग्राहकांना अधिकाधिक फायदा होण्याच्या दृष्टीने ते नेहमीच प्रयत्नशील असतात.

खास सुवर्णग्राहकांसाठी विविध डिझाईन्समध्ये बकुळीहार, राणीहार, शाहीहार, नेकलेस, ठुशी, ताशीवमाळ, पाटल्या, बांगड्या, टॉप्स तसेच टेम्पल ज्वेलरी मध्ये बिंदी, बाजुबंद, टॉप्स्, झुमका, काप, नेकलेस, अंगठी, चोकर, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट, पदक व गंठणची भव्य श्रृंखला.. आपणांस हजर स्टॉकमध्ये उपलब्ध आहे.

खास चांदीमधील ताट, वाटी, चमचा, फुलपात्र, पुजा सेट अशी विविध प्रकारची, वेगवेगळ्या वजनाची चांदीची भांडी येथे उपलब्ध आहेत. पायल जोडवी च्या ३००० पेक्षा अधिक डिझाईन येथे आपल्यासाठी सादर केलेल्या आहेत.

चंदुकाका ज्वेल्स्मधील सुवर्णसमृध्दी योजनेव्दारे आपणांस मोठी सुवर्णखरेदी करता येणे शक्य होणार आहे. येथील सुवर्णखरेदी केलेल्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणत्याही प्रकारची घट धरली जात नाही हे चंदुकाका ज्वेल्स्चे विशेष वैशिष्ट्ये.

या स्किममुळे ग्राहकांना जेवढी. अधिक खरेदी तेवढी अधिक मजुरीत सूट मिळणार आहे. तेव्हा आपण आपली सुवर्णखरेदी आजच चंदुकाका ज्वेल्स्, सावेडी येथील आपल्या हक्काच्या सुवर्णदालनातून करा आणि भरघोस मजुरीत सूट मिळवा असे आवाहन संचालकांनी केले आहे.


# सेवा संकल्प अभियानांतर्गत राजुरीत घनकचरा व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन

## सीआरपी व ग्रामसंघ पदाधिकाऱ्यांना नवीन नियमांची माहिती



नगर – सेवा संकल्प अभियानांतर्गत ग्रामपंचायत राजुरी, ता. राहाता येथे बचत गटातील सामुदायिक संसाधन व्यक्ती (CRP) व ग्रामसंघ पदाधिकाऱ्यांना घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कचऱ्याचे उगमस्थळी वर्गीकरण, ओला व सुका कचरा संकलन, योग्य व्यवस्थापन, पुनर्वापर व पुनर्चक्रण तसेच स्वच्छता उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग याबाबत माहिती देण्यात आली. १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या नवीन नियमांनुसार कचऱ्याचे चार प्रकारांत उगमस्थळी वर्गीकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला. CRP व ग्रामसंघ पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नागरिकां–मध्ये जनजागृती करून स्वच्छ व कचरामुक्त ग्रामपंचायतीच्या निर्मितीसाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी शालेय विद्यार्थ्यांचाही सहभाग घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांकडून प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये प्लास्टिक कचरा भरून तो शाळेत जमा केला जात असून, या उपक्रमातून प्लास्टिक कचरा संकलन व योग्य व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

